

आपल्या अचाट योग सामर्थ्यामुळे बाबा, छताला टांगलेल्या अरुंद फळीवर चढून झोपत असत.

# श्री साईनाथ वाचनालय

**श्री साईबाबा संस्थान, शिर्डी.**

[किंमत एक रुपया

मे १९८३]

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक


: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

डॉ.श्री.दि.परचुरे
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

श्री.सदानंद चेंदवणकर
( मराठी आवृत्ती )


## श्रीसाई वाक्सुधा


वर्ष ६२ वे ) किंमत १ रुपया ( अंक २

मे १९८३

दूरध्वनी
८८२२५६१

: कार्यालय :
" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



## श्रीसाई वाक्सुधा

जन्ममरण- यातायाती ।
चुकवाव्या जे मनें इच्छिती ।
तिहीं अखंड स्मरणभक्ति ।
गुरुपदामक्ति जोडावी ॥ ११ ॥

प्रमाद मिथ्या ज्ञानाचें कारण ।
आत्मरुपीं अनवधारण ।
जेथूनि उद्भवे जनन-मरण ।
सर्वानर्थ – निदान जे ॥ १२ ॥

मोह म्हणजे मिथ्या ज्ञान
अनात्म ठायी आत्माभिमान ।
नाव मृत्यु विद्वज्जन ।
लक्षण करितात ॥ १३ ॥

साईकथा-सागरमंथन ।
करितां साई कथाकथन ।
गोडी जिची नित्यनूतन
श्रोत्यांचे अधःपतन चुकेल ॥१४॥

साईचें गुणमय स्थळ स्वरुप ।
त्याचें करितां ध्यान अमूप ।
प्रकटेल सूक्ष्मतम आत्मस्वरुप ।
होऊनि लोप सगुणाचा ॥ १५ ॥

श्रीसाई सच्चरित अध्याय ५२ वा

# नूतन शकाभिनंदन !

नूतन शकाभिनंदन


शालिवाहन शका प्रमाणे सुरू होणारे नूतनवर्ष (शके १९०५) श्रीसाईबाबांच्या समस्त भक्तांना, श्रीसाईलीलाच्या वाचकांना, हितचिंतकांना, जाहिरातदारांना सुखाचे, समाधानाचे, वैभवाचे उत्कर्षाचे आणि श्रीसाईभक्तीत अधिकाधिक प्रगतीशील जाओ अशी शुभेच्छा व्यक्त करतो.

—संपादक

# अनुक्रमणिका मे १९८३


| | | |
|---|---|---|
| १) संपादकीय | — | श्रद्धा आणि सबुरी |
| २) श्री उपासनी महाराज | — | श्री साईनंद |
| ३) श्री भगवंतराव महाराज | — | — |
| ४) साईकृपा लाभलेले — श्री नन्हे बाबूजी | — | — |
| ५) साईबाबांचा त्रैलोक्य संचार | — | श्री. विश्वासराव खेर |
| ६) जन्मकर्मच मे दिव्यम | — | श्री अनंत जयदेव चितांबर |
| ७) सर्वभूति आत्मा एकच | — | श्री बाळकृष्ण देसाई |
| ८) श्री साई अनुभव | — | सौ. स्वाती जयकर |
| ९) बीदर — संतांच कसोटीस्थान | — | श्री. लक्ष्मणराव रापतवार |
| १०) भक्ताचा रोमहर्षक अनुभव | — | श्री. शाम अहुजा |
| ११) माधवी—माधव | — | श्री. ग. रा. पालकर |
| १२) बाबांच्या उदीचा महिमा | — | सौ. रेखा माहिमकर |
| १३) साईमाऊली पळवी दुःखाची सावली | — | श्री. उज्वल कुलकर्णी |
| १४) संकट समयी बाबा धावून येतात | — | सौ. कुसूम केकरे |
| १५) संकटकाळी धावत येई | — | श्रीमती राधाबाई पालेकर |
| १६) बाबांचे बोधामृत व तत्त्वज्ञान | — | श्री. गौरुराम उरणकर |
| १७) श्रीबाबांची लीला | — | सौ. अहिल्याबाई ढोबळे |
| १८) साई पाहू या ग | — | श्री. शांताराम नांदगावकर |
| १९) आई बायजाबाई | — | सौ. आसावरी वायकूळ |
| २०) साईचा संसार | — | सौ. शारदा वाकनीस |
| २१) श्रीसाई आराधना | — | सौ. अनिता कोरडे |
| २२) साईको आराम कहाँ | — | श्री. जयवंत कुलकर्णी |
| २३) तूच किनारा आता | — | श्री. प्रकाश परब |
| २४) साई कसा हा चाले तुझा खेळ | — | सौ. प्रमोदिनी पोतनीस |
| २५) भक्ताची पुकार | — | प्रो. एच. बी. महाले |
| २६) संत स्तुती | — | श्री. पंढरीनाथ खर्डीकर |
| २७) शिरडीवृत्त | — | फेब्रुवारी-मार्च १९८३ |

# श्रद्धा आणि सबुरी




सब्र म्हणजे शांती, सबुरी म्हणजे धीर, श्रद्धा म्हणजे भक्ती. श्रीसाई बाबांची मुख्य शिकवण म्हणजे श्रद्धा आणि सबुरी धरा. बाबांचा हाच खरा गुरुमंत्र हा मंत्र जपला, आचरणात आणला की, सर्व सिद्धी प्राप्त होतात.

तुम्हाला परमेश्वराची भेट घ्यायची असेल तर, त्यासाठी अनेक मार्ग निरनिराळ्या संतांनी सांगितलेले आहेत. श्रीसाई बाबांनी परमेश्वर प्राप्तीचे किंवा तुम्हाला जे जे काही प्राप्त करून घ्यायचे असेल, ते मिळविण्याचे साधन अवघ्या दोनच शब्दात सांगितलेले आहे. श्रद्धा आणि सबुरी हेच ते किती साधेसुधे व व्यवहारात नेहमी घोकले जाणारे दोन शब्द. परंतु ते आमच्या दैनंदिन आचरणात येत नाहीत.

परमेश्वराचा दरबार गाठण्यासाठीच नव्हे तर आपणास कोणताही दरबार गाठावयाचा असेल किंवा कितीही कठीणातले कठीण ध्येय साध्य करावयाचे असेल तर या दोन गुणांचे इमाने इतबारे पालन केले त्यांना चिकटून राहिले तर, आपण या जगातील वाटेल ती वस्तू, गोष्ट साध्य करून घेऊ शकतो.

श्रद्धा म्हणजे अंधश्रद्धा नव्हे. श्रद्धा म्हणजे ज्ञान. श्रद्धा म्हणजे द्वैत नव्हे, श्रद्धा म्हणजे अद्वैत श्रीसाई म्हणतात.

सर्व चराचरामध्ये भरलेला ईश्वर तुझ्या-माझ्यात भरला नाही का ? अशी कोणती जागा असू शकेल, की जेथे ईश्वर नाही ? मग तुलाच तो सोडून कोठे राहिल ! तू जे स्वतः चांगले करतोस, ते मला अर्पण कर व वाईट जे करतोस ते पण अर्पण कर. बरे वाईट करणारा तू कोण ? चांगल्यात पण मी आहे व वाईटात पण मी आहे. फुकटचे ओझे बऱ्या वाईटाचे तू स्वतःच्या डोक्यावरून वाहू नकोस. तू जे काही करशील, ते मी पहातच आहे. तेव्हा तुला जर कुणावर रागवायचे असल्यास तू माझ्यावर रागव. मलाच शिव्या दे. त्यातून तुला सत्य सापडेल. तुझे समाधान होईल. कुणाला हडहड करू नकोस कारण मी तोच आहे. तुला कुणाला काही देता येत नसेल तर देऊ नकोस पण त्याला न दुखावता गोड शब्दांनी सांग. "

तुमचा उद्योग धंदा, व्यापार किंवा व्यवहार कोणताही असेना का तुम्ही जे हाती घ्याल, ज्याकडे प्रवास करीत आपले ध्येय गाठण्यासाठी तुम्हाला जायचे असेल, त्यावर तुमची संपूर्ण श्रद्धा पाहिजे. ते माझे जीवन सर्वस्व आहे व ते मी प्राप्त करून घेणारच अशी महत्वाकांक्षा व अशा प्रकारची जिद्द तुमच्या ठायी निर्माण झाली पाहिजे. इतकी ती श्रद्धा ज्वलंत पाहिजे. श्रीबाबांच्या श्रद्धेच्या विषया संबंधाने एक स्वतंत्र विश्व निर्माण होते. बाबांची इच्छा एवढया स्पष्टीकरणाने श्रद्धेचे समाधान होते. एका भक्ताने याबाबत एक घटना सांगितली. एक भक्त बाबांच्या दर्शनास गेले. त्यावेळी आढ्यावर एक पाल चुकचुकत होती. भक्ताने विचारले, "बाबा ही पाल काय म्हणते ?" बाबा म्हणाले, "तिची बहीण इतक्यात तिला औरंगाबादेहून भेटायला येणार आहे. बहिणीच्या भेटीसाठी ती आतुर झाली आहे. तेवढ्यात बाहेर कुणी दुसरे एक भक्त टांग्यातून भेटण्यास आले. त्याने टांग्यातील सामान काढले व घोड्याचा तोबरा जोराने आपटला. त्यासरशी तोबऱ्यातून एक पाल सरसरा धावत सुटली व ती थेट पहिल्या पालीजवळ जाऊन तिला कडकडून भेटली. हा चमत्कार अनेकांनी पाहिला. कुठं औरंगाबाद व कुठे शिरडी पण बाबांच्या अतर्क्य ज्ञानाने त्या भक्ताची श्रद्धा शतगुणीत झाली. श्रद्धेचे सामर्थ्य हा विज्ञानाचाही एक विषय झाला आहे. असे काही अतर्क्य ज्ञान ज्यांना होते अशा व्यक्तींचे अस्तित्व नाकारता येत नाही. अनुमान आहे त्याअर्थी कार्यकारणभाव असलाच पाहिजे असा तर्कबुद्धीचाही हट्ट नाकारता येत नाही. तर्कबुद्धीचे समाधान करता येत नाही. तोपर्यंत तरी श्रद्धेचे वैभव उपभोगण्यास काय हरकत आहे ?

आणि याचबरोबर दुसरी अत्यावश्यक गोष्ट म्हणजे तुम्हाला जे प्राप्त करून घ्यायचे असेल त्यासाठी उतावळेपणा कामाचा नाही. कोणतीही चांगली गोष्ट तडकाफडकी घडून येऊ शकत नाही. त्यासाठी जबरदस्त हालचाली कराव्या लागतात, हाल अपेष्टा भोगाव्या लागतात आशा निराशेच्या फेऱ्यात गुरफटावे लागते; आणि हे सारे घडत असताना आपण धीर बाळगावा लागतो. त्याचेच नाव सबुरी. आपण म्हणत असतो की जरा सबुरीने घ्या, उतावळेपणा करू नकात. उतावळेपणा करणे म्हणजे कार्य नाशाला आमंत्रण करण्यासारखे आहे ते करू नका.

बाबांच्या या दोन मंत्रांची कास ज्याने धरली, त्यांनी आपले मनोवांछित साध्य करून घेतले आहे. कोणत्याही क्षेत्रात तुम्ही वावरत असा. श्रद्धा आणि

सबुरी या दोन गुणांची कास बळकट धरा, म्हणजे यश तुमच्या पदरात पडल्याशिवाय राहणार नाही. अगदी शंभर टक्के यश पाठीशी आहेच असे समजा.

साईबाबा नेहमी भक्त नानासाहेब चांदोरकरांना म्हणत, "नाना, लई पैका देणारे आपल्याकडे पुष्कळ लोक येतात, पण आपल्याला कुणी दोन दिडक्या पण देत नाहीत" नानांनी यावर बराच विचार करून त्या दोन दिडक्या शोधून काढल्या त्या म्हणजे श्रद्धा आणि सबुरी या होत. श्रद्धेने परिस्थितीवर व सबुरीने काळावर विजय मिळवता येतो." निश्चयाचे बळ तुका म्हणे तेचि फळ' हा अभंगही सबुरी चाच सल्ला. देतो.

—जय श्री साईराम

## डॉ. गव्हाणकर यांच्या चरित्र ग्रंथाचे प्रकाशन

प्रसिद्ध साईभक्त डॉ. के. भ. उर्फ अण्णासाहेब गव्हाणकर यांच्या चरित्र-ग्रंथाचा प्रकाशन समारंभ रामनवमीच्या सुमुहुर्तावर इंदिरा निवास, लाल बहादूर शास्त्री मार्ग, कुर्ला या त्यांच्या निवासस्थानी सायंकाळी ४ वाजता मोठ्या थाटाने साजरा झाला. त्यांच्या चरित्र ग्रंथाचे नाव 'प्रभाव श्री साईचा' असे असून ते ठाण्याचे गद्य पद्य लेखक श्री. विनायक सदाशिव महाबळेश्वर यांनी लिहिले आहे. हा ग्रंथ श्री. चंद्रकांत दामोदर सामंत, डॉ. गव्हाणकर शिरडी कोजागिरी उत्सव मंडळातर्फे प्रकाशित करण्यात आला असून त्याची किंमत २० रु. आहे. हा ग्रंथ पुण्याच्या विदर्भ मराठवाडा बुक कंपनीचे श्री. अ. ज. प्रभु यांचे शुभहस्ते प्रकाशित करण्यात आला. या समारंभाचे अध्यक्षस्थानी ठाण्याचे सुप्रसिद्ध कवी श्री. पी. सावळाराम हे होते. या समारंभास पार्ल्याचे श्रीसद्‌गुरू आठवले महाराज व हरीओम बागवे महाराज हजर होते. हरीओमनी १०१ रु. ची देणगी दिली. पुण्याचे शिघ्रकवी श्री. देशपांडे यांनी या संपूर्ण समारंभाचे वर्णन लगेच काव्यात करून ते वाचूनही दाखविले व शाबासकी मिळविली. या चरित्र ग्रंथाला ठाण्याचे डॉ. श्री. म. भातखंडे यांची प्रस्तावना लाभली असून ते पण या समारंभास हजर होते. ठाण्याचे कवी श्री. म. पां. भावे, साईलीलाचे कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर व श्री. गव्हाणकर यांची असंख्य चहाते मंडळी या समारंभास हजर होती. १८४ पानाच्या या ग्रंथाच्या मुखपृष्ठावरील चित्र छानदार आहे.

श्री साईसहवासातील भक्ताचे पुण्य स्मरण

# साकोरीचे उपासनी महाराज

• श्रीसंत उपासनी महाराज हे मूळचे अमरावतीचे. त्यांचे संपूर्ण नाव काशीनाथ गोविंद उपासनी. अमरावतीला ते " गोविंद यू सटाणेकर " या नावाने प्रसिद्ध होते. ते तिथे वैद्यकीय व्यवसाय करीत. विशेषतः अमरावतीचे प्रख्यात भक्त खापर्डे कुटुंबियात त्यांचा औषधोपचार चाले म्हणून ते खापर्डे घराण्याशी जास्त परिचित होते.

श्री उपासनी महाराजांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील सटाणे या गावी १५ मे १८७० साली झाला. बालपणापासूनच त्यांना अध्यात्माची ओढ होती, व तत्वचिंतनाचे वेड होते. या आत्म साक्षात्काराच्या तळमळीनेच त्यांना घरातून बाहेर काढले गेले. आणि त्यांनी तपश्चर्येची वाट चोखाळली. सद्गुरुंच्या शोधार्थ असताना शिरडीच्या श्रीसाईनाथांची व त्यांची १९१० साली गाठभेट झाली. साईबाबांच्या आज्ञेवरूनच त्यांनी शिरडीला चार वर्षे काढली. साईनाथांच्या कृपेनेच सिद्धावस्था प्राप्त झाल्यावर अनेक ठिकाणी त्यांनी भ्रमंती केली. व शेवटी या महापुरुषाचे पाय नगर जिल्ह्यातच शिरडी-पासून अवघ्या सहा किलोमिटर अंतरावर असलेल्या साकुरी या खेडेगावी विसावले. त्यावेळी महाराजांनी गावाबाहेरील स्मशानात वास्तव्य केले. कित्येक वर्षे या साकुरीची माहितीही कुणाला नव्हती. परंतु श्री उपासनी बाबांनी येथे वास्तव्य करून या खेड्यास महत्व प्राप्त करून दिले.

आज श्री उपासनी बाबांच्या विभूती मत्वाने साकुरी हे एक क्षेत्राचे स्थान बनले आहे. महाराजांच्या प्रभावामुळेच तेथल्या स्मशानाचे वैकुंठ कैलासात रुपांतर झाले व आज ते एक महान सांस्कृतिक केंद्र आणि धर्मविद्यापीठ निर्माण झाले आहे.

श्रीसाईबाबा उपासनींना नेहमी म्हणत असत.—

" अरे तुझा माझा युगानुयुगे ऋणानुबंध आहे. "

गत जन्मी ते मुल्हेर येथे उद्धवस्वामी या नावाने वावरत होते. श्री उपासनी महाराजांनी शेवटपर्यंत गोणपाटाशिवाय दुसरे कोणतेही अंगवस्त्र वापरले नाही. बाबा महाराजांना रोज भिक्षेतील एक भाकरी पाठवित असत. साई-

बाबांनी त्यांची खूप कठोर परीक्षा घेतली व ते सर्व त्यांच्या कसोटीला उतरले. उपासनी बाबांनी बाबांवर जे "साईनाथ महिमा स्तोत्र" संस्कृतात रचले आहे ते खरोखरीच श्रवणमधुर आहे. ते असे.—

सदा स त्स्वरूपं चिदानंद कंदम् ।
जगत्संभवस्थान संहार हेतुम ॥
स्वभक्तेच्छया मानुसं दर्शयंतं ।
नमामी श्वरं सद्गुरूं साईनाथम्

हे स्तोत्र गेली ५८ वर्षे शिरडीस समाधी मंदिरात दुपारच्या आरतीच्या वेळी म्हटले जात आहे.

श्रीसाईबाबांच्या अंत्यसंस्काराचे पौरोहित्य उपासनी महाराज आणि बाळासाहेब भाटे यांनी केले. श्रीसाईबाबांचा तेरावा दिवस भक्तांनी मोठ्या-प्रमाणावर साजरा केला. हजारो लोक जेवण करून गेले. तरी जेवणाचे वेळी केलेला लाडवांचा ढीग जसाच्या तसाच कायम राहिला होता! हा प्रकार पाहून सर्व भक्तांना श्री बाबांच्या लीलेचे कौतुक वाटले होते. नंतर ते लाडू यात्रेकरूंना प्रसाद म्हणून वाटण्यात येत होते.

श्रीसाईबाबांकडून प्राप्त झालेल्या दैवी गुणांचा पारमार्थिक वारसा श्री उपासनी महाराजांनी जतन केला, आणि तोच वारसा पुढे त्यांच्या परम-शिष्या श्रीमती गोदावरी माताजींनी आज चालविला आहे.

श्री उपासनी महाराजांनी सुरू केलेल्या भक्तीच्या चळवळीत श्री माताजींनी नवीन प्राण ओतले व तिला मोठीच चालना दिली. साकुरीच्या पावन भूमीतून उगम पावलेली भक्तीची गंगा आता दुथडी भरून वाहात असून अखिल विश्वात ती पावन करीत आहे. या भक्तीच्याच चळवळीस आद्य प्रेरणा श्रीसाईबाबांची होती; हे सत्य मात्र नजरेआड करता येणार नाही.

उपासनी महाराज हयात असताना त्यांनी भारतभर संचार केला, व सटाणा नागपूर, सुरत आणि हैद्राबाद या ठिकाणी आश्रमांच्या शाखांची स्थापना केली. कन्याकुमारी स्थान आणि यज्ञसंस्था ही महाराजांच्या कार्याची व आश्रमाची लोकोत्तर वैशिष्ट्ये होत. उपासनींची प्रवचने 'उपासनी वाक्सुधा' या नावाने प्रसिद्ध आहेत. सुमारे पाच हजार पृष्ठांचा त्यांचा वाङ्मयीन

संसार आहे. मोक्ष, मुक्ती, संत, सद्‌गुरू, मनोनिगृह इ. विविध विषयांवर त्यांनी आपल्या विचारातून विवेचन केलेले आहे.

१९४१ साली श्रीउपासनी महाराज साकुरी येथे समाधिस्थ झाले. त्यांच्या या महिन्यात १५ मे रोजी येणाऱ्या जन्मदिनानिमित्त त्यांना कोटी कोटी प्रणाम !

पुण्यस्मरणानिमित्त

# आर्वीचे भगवंतराव महाराज

आर्वी शहरात 'गुरुजी वॉर्ड' नावाचा मोहल्ला असून तेथे एक गुरुजींचा मठ आहे. गुरुजी भगवंतराव महाराज तेथे रहात असत. महाराजांचा पेशा पोस्टमास्तरचा असे. महाराज मूळचे वत्सगुल्म वाशीमचे. तेथेच महाराजांचा जन्म २८ एप्रिल १८७३ रोजी झाला. त्यांच्या वडीलांचे नाव गोपाळशास्त्री जोशी असे होते. ते भारद्वाज गोत्री शुक्लयजुर्वेदी शाखेचे होते. भगवंतरावांचे शिक्षण ९ वी पर्यंत झाले. पुढील शिक्षणार्थ गरीबीमुळे परगावी जाणे शक्य नसल्यामुळे अल्पवयातच महाराजांना पोष्टाची पायरी पहावी लागली. पोष्ट खात्यात बदल्या होत गेल्यामुळे त्यांचे जीवन प्रवासी झाले. अनेक अडीअडचणींना तोंड देत ते जीवन जगले. पोष्टाची गोष्ट म्हणजे कष्ट. सारे सुखदुःख त्यांनी धैर्याने सोसले. २५ वर्षे नोकरी करून अनेक कठीण प्रसंग अनुभवले त्यांनी स्वतः केलेल्या अनेक पदातून ते प्रसंग व्यक्त होतात. अखेरीस ते पोष्ट खात्याचे जिल्हा इन्स्पेक्टर झाले. १९१७ साली त्यांना रायपूरला अर्धांगवायूचा झटका आल्यामुळे १९१८ पासून ते सेवानिवृत्त झाले. त्याच वर्षी त्यांची धर्मपत्नी सौ. राधाबाई वैकुंठवासी झाल्या. राधाबाई आत्मज्ञानी असून त्यांनी श्री वासुदेवानंद सरस्वती यांचा उपदेश घेतला होता. त्यांची एकुलती एक कन्या शांताबाई यांचा विवाह गुरुजींच्या पश्चात् अमरावतीकर अध्यापक गणोरकरांशी झाला.

पत्नी निधनानंतर गुरुजी १९२२ पर्यंत आर्वीस घर करून राहिले. त्यालाच गुरुजीमठ म्हणतात. श्री संत मायबाई पासून अनेक संत आर्वीच्या आवारात आयुष्याच्या अंती राहावयास आले. निवृत्त अवस्थेत अनेकांना आर्वीचा आधार वाटला. शासकीय सेवेत भटकंती करणारे भगवंतरावहि अखेरीस आर्वीसच आले. त्यांनी प्रपंच साधून परमार्थ केला. किशोरावस्थेतच त्यांची वृत्ति उदासीन होती. त्यांनी पारडीकर देशपांडयांचा उपदेश घेतला होता. त्यांच्याच कृपेने त्यांनी 'सद्गुरुलीलामृत' नावाचा ग्रंथ पूर्ववयात लिहिला व गुरु भालचंद्र महाराजा प्रमाणेच आजीवन परमार्थाचा प्रपंच केला. महाराजांची आकृति प्रकृति आकर्षक असलेली आर्वीकरांनी अखेरपर्यंत पाहिली. ते वर्णाने गौर व निकोप होते. ते प्रसिद्धी पराङ्मुख होते. मठात स्वान्तःसुखाय भजनानंदात त्यांचा काळ जाई. कीर्तन प्रवचनकाराप्रमाणे त्यांनी आत्मप्रतिष्ठा वाढविली नाहीं. १९०९ च्या सुमारास दारव्हा येथे पोष्ट मास्तर असताना त्यांना शेगावच्या गजानन महाराजांचे दर्शन घडले. परिसरातील अनेक साधुसंतांचा सत्संग त्यांनी साधला. विरक्तावस्थेत त्यांनी अनेकांना बोध दिला. एवढेच नव्हे तर त्यांच्या संपर्कात आलेल्या अवघ्यांचा संसार सुखाचा होण्यास साह्य केले. परमार्थाप्रमाणेच भक्तगणांना प्रापंचिक प्रश्नांचे अचूक मार्गदर्शन करीत. अनेकांना त्यांनी नवजीवन प्राप्त करून दिले. गुरुजी आर्वीस असताना त्यांना भारसवाडयास नेण्यात आले होते. तेथे गुरुजीलिखित पोथीच्या पारायणाची समाप्ती होती. त्याचवेळी त्यांचे शिष्य भैय्याजी जोशी वारल्याचे वृत्त त्यांच्या कानी आले. त्यावेळी ध्यान लावून भैय्याजीस भस्म विलेपन करून त्यांनी जीवदान दिले. अशा अनेक आख्यायिका आहेत. आयुष्याच्या अखेरीस महाराज वाशीमला आले. तेथेच ते २५ मे १९२२ रोजी वारले. आजही आर्वीला मठात त्यांचा पुण्यतिथी उत्सव होत असतो.

श्री भगवंतराव महाराज परम साईभक्त होते.

# १०० टक्के साईकृपा लाभलेले नन्हे बाबूजी

—साईनंद

संत चूडामणी भगवान श्री साईबाबांना आपल्या चर्मचक्षूंनी अनेकदा पाहिलेले, दर्शन घेतलेले आणि त्यांच्याच कृपाशिर्वादामुळे आज भारतात सुकीर्ती मिळविलेले एक उत्कृष्ट पेटीवादक आपल्यात आहेत. अगदी बाबांच्या वेळेपासून तो आजतागायत ते संगीत क्षेत्रात वावरत आहेत. त्यांचे नाव आहे नन्हे बाबूजी. कर्नाटक राज्यात बीदर येथे ते सध्या रहातात.

बाबूजींचा जन्म ५ जानेवारी १९११ रोजी राजस्थानातील जयपूर जिल्ह्यात गडहिंमतसिह येथे झाला. त्यांचे वडील ठाकूर प्यारेलाल हे त्याकाळातले एक संगीतज्ञ होते. ते सितारे नवाझ पण होते. ते त्यावेळी मुंबईत रहात. नन्हे बाबूजी दीड वर्षाचे असतानाच त्यांचे वडील वारले. आपल्या आईवडीलांचे ते एकुलते एकच असल्याने चुलते अमीरलाल गंधर्व यांनी त्यांना लहानाचे मोठे केले. तेच त्यांचे त्यांच्या वयाच्या १२ व्या वर्षापर्यंत 'गुरुजी' व पालक. ते वीणा उत्तम वाजवत व गात पण असत. त्यांचेकडून ते सितार व बाजाची पेटी वाजविण्यास शिकले.

नन्हे बाबूजी वयाचे सात वर्षांचे असताना आपल्या गुरुजींबरोबर शिरडीला गेले होते. पोरवय असल्याने ते मशिदीच्या (द्वारकामाई) बाहेर एका कुत्र्याच्या पिल्लाबरोबर खेळत होते. साईबाबा मशिदीत कठड्याला टेकून बसले होते. त्यांची दुपारची आरतीची वेळ झाली होती. कुत्र्याच्या पोराबरोबर नन्हे बाबूना खेळताना बघून गुरुजींना संताप आला व त्यांनी छडीचा प्रसाद त्यांना दिला. रडत रडत ते मशिदीत बाबांकडे गेले. पुजाऱ्याने त्यांचे रडे थांबविण्याचा प्रयत्न केला पण बाबांनीच त्यास त्यांना आपल्या जवळ घेऊन येण्यास सांगितले. बाबांनी गुरुजीनाहीं आपल्या जवळ बोलावून सांगितले छडी घेऊन तू माझ्या पाठीशी का लागला होतास? त्याला पुन्हां फटकारु नकोस. हा तुझा नन्हे बाबू पुढे देशातला प्रसिद्धवादक गवई होईल. आणि काय आश्चर्य बाबांच्या शुभाषिकामुळेच नन्हे बाबूजी आज देशातले एक विख्यात गायक व हार्मोनियमपटू म्हणून लौकिक पावलेले आहेत.

तीन महिने बाबूजी शिरडीस होते. या काळात दररोज ते बाबांचे अनेकदा दर्शन घेत असत. बाबा त्यांना दर दिवशी ३ ढबू देत असत. त्यापैकी २ पैशाचे फुटाणे व १ पैशाचा गूळ ते घेत व खात. बाबांच्या हातची बर्फी त्यांनी खाल्लेली आहे. बाबांना त्यांनी नेहमी कपाळाला चंदन लावलेले पाहिले आहे. नव्हे बाबूजींनी हिंदी मधून मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण घेतलेले असून मुरादाबाद विद्यापीठाच्या "संगीत पंचानना" व "संगीत भूषण" या परीक्षा प्रथम वर्गात उत्तीर्ण केलेल्या आहेत. काश्मीरचे महाराज हरिसिंग व रामगडचे महाराज बक्षरसिंग यांचे दरबारातील गायक म्हणून त्यांचा मानसन्मान ठिकठिकाणी संगीत बैठकीत केला जाई. नागपूर, लाहोर, कलकत्ता, औरंगाबाद, हैद्राबाद, काश्मीर इ. ठिकाणच्या नभोवाणी केंद्रावरून त्यांचे कार्यक्रम अनेकदा झालेले आहेत, रसिकांनी ऐकलेले आहेत. रविंद्रकला क्षेत्र बंगलोर येथे त्यांचा २८ मार्च ८२ रोजी ५ हजार रु. चा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला होता. बीदर येथे त्यांनी श्रीगुरु संगीत विद्यालयाची स्थापना केलेली असून आपले सारे उर्वरित जीवन याच संगीत कलेपायी व्यतीत करायचे असे त्यांनी ठरविले आहे. आपल्याला मिळालेल्या साऱ्या यशाचे रहस्य श्री साईबाबाच होत त्यांच्याच कृपाशिर्वादामुळे आपण या पदास चढलो असे आपल्या डोळ्यात आसू आणून व बाबांना नमन करून ते नेहमी सांगतात.

★

# साईबाबांचा त्रैलोक्य-संचार
## शास्त्रज्ञ नरके यांच्या अनुभवाचे बोल

—श्री. विश्वास बाळ खेर

० साईच्या दरबारात अनेक जातींचे, पंथांचे, पेशांचे लोक हजेरी देत. त्यात एक शास्त्रज्ञसुद्धा होते. ते म्हणजे प्राध्यापक जी. जी. नरके. १९०५ साली कलकत्ता विद्यापीठाच्या एम. ए. परीक्षेत भूगर्भशास्त्र विषय घेऊन उत्तीर्ण झाल्यावर, १९०७—०९ मध्ये त्यांनी भूगर्भशास्त्रविषयक पहाणीचे शिक्षण घेतले. नंतर हिंदुस्थान सरकारच्या शिष्यवृत्तीवर ते उच्च शिक्षणासाठी मँचेस्टरला गेले व १९१२ मध्ये त्या विद्यापीठाची एम. एस.सी पदवी प्राप्त करून स्वदेशी परतले.

प्रा. नरके हे नागपूरचे श्रीमंत बॅरिस्टर गोपाळराव बुटी यांचे जामात होते व बॅ. बुटी साईबाबांचे एक भक्त होते. तसेच प्रा. नरकेंच्या मातोश्री सुद्धा साईबाबांच्या भक्तांपैकी होत्या. बॅ. बुटींच्या सांगण्यावरून प्रा. नरके एप्रिल, १९१३ साली शिरडीला गेले. बाबांचे लाडके भक्त माधवराव देशपांडे उर्फ श्यामा त्यांना घेऊन साईबाबांकडे गेले व त्यांची ओळख करून देऊ लागले. श्यामाला थांबवून बाबा म्हणाले, “तू मला त्यांची ओळख करून देतोस! अरे, तीस पिढ्यांची त्याची माझी ओळख आहे.” एवढ्या आत्मविश्वासाने भूतकाला-विषयी सांगणाऱ्या साधूवर एका शास्त्रज्ञाचा विश्वास बसणे कसे शक्य आहे? परन्तु जशी प्रचिती येत गेली तसा अनुभवाने नरक्यांचा बाबांच्या शब्दांवर विश्वास बसू लागला. आणि तो इतका की ते आपल्या निवेदनात म्हणतात, “साईबाबांनी कधीही असत्य भाषण किंवा अर्थशून्य पारिभाषिक वक्तव्य केले नाहीं. अनेकांना त्यांच्या पूर्वीच्या जन्मांबद्दल व त्यातील ठळक घटनांसंबंधी त्यांनी सांगितल्याचे मला ठाऊक आहे. माझ्या चार पूर्वजन्मांच्या आयुष्यातील घटना त्यांनी दुसऱ्यांच्या उपस्थितीत सांगितल्या. परन्तु बाबा माझ्यासंबंधी बोलत होते ते दुसऱ्यांना कळू शकले नाहीं. लक्षात ठेवण्याची गोष्ट म्हणजे एकाच बैठकीत बऱ्याच लोकांना जरूर त्या वस्तू काही कृतीने किंवा शब्दाने सूचित करण्याचे कौशल्य त्यांना अवगत होते.” इतकेच काय तर बाबा त्रिकाल-ज्ञानी होते हे नरक्यांना कळून चुकले. प्रा. नरके म्हणतात, “मी अनेक वेळा त्यांची परीक्षा घेतली. प्रत्येक परीक्षेनंतर माझा विश्वास दृढ होत गेला की ते

सर्वज्ञानी व सर्वसाक्षी होते व स्वतःच्या इच्छेप्रमाणे परिस्थितीला वाकविण्याचे सामर्थ्य त्यांच्यात होते. शेकडो गोष्टी माझ्या अनुभवाला आल्या त्यापैकी थोडयांचा मी निर्देश करतो. ज्या दर्शवितात की ते त्रिकालज्ञानी होते व भूत, वर्तमान व भविष्य कालांची कुठलीही घटना त्यांना अपरिचित नव्हती."

मशिदीत बाबांचे नरक्यांना प्रथम दर्शन घडले तेव्हां बाबा आपल्या भेदक नजरेने त्यांचा जणू काय वेध घेत आहेत असे त्यांना भासले. आणि बाबांच्या चावडीत बसलेल्या मूर्तीचा स्पष्ट ठसा त्यांच्या अंतःकरणावर उमटला. एकदा आरती चालू असता बाबा क्रोधायमान झाले व अज्ञात कारणासाठी त्यांनी आपल्या वाणीने आकाशपाताळ एक केले. त्यावेळी नरक्यांच्या चित्तात शंका उद्‌भवली की बाबा वेडे तर नाहीत! आरती नेहमीप्रमाणे संपली. त्याच दिवशी दुपारी नरके बाबांचे हातपाय चेपत असता त्यांचे डोके थोपटून बाबा उद्‌गारले, "मी वेडा नाही बरं का!" परिणामी, त्यांचे सुप्त विचार व इच्छा बाबा ओळखतात हे नरक्यांना समजू लागले. हे झाले भूत व वर्तमान कालासंबंधी. आता भविष्यकालातील घटना सूचित करण्याची बाबांची कला पाहा.

नरक्यांना त्यावेळी कायमची नोकरी नव्हती म्हणून त्यांच्या आईला चिंता वाटे. विलायतेला जाऊन ते भूगर्भशास्त्रज्ञ व खाणींचा इंजिनियर होऊन आले होते आणि भूगर्भशास्त्रविषयक पहाणीचीच तात्पुरती कामे त्यांना वेळोवेळी मिळू लागली. १९१३ सालच्या एप्रिल महिन्यात शिरडीला तीन-चार दिवस राहून ते बालाघाट व ब्रम्हदेशाला गेले. तीन महिन्यानंतर आपली कामे संपवून ते नागपूरला व तेथून शिरडीला गेले, व पत्नीसह तेथे चार महिने काढून नागपूरला परतले. माधवराव देशपांडयांकडून त्यांना पुन्हां पत्र आले की, बाबांनी त्यांना बोलाविले आहे. ह्या खेपेस ते एकटे शिरडीला गेले व तेरा महिने तेथे राहिले. यावेळी त्यांना काही काम किंवा नोकरी नव्हती. परन्तु बाबांच्या सान्निध्यात त्याची तमा त्यांनी बाळगली नाहीं. असे त्यांचे जीवन पाहून, पुढे काय याची नरक्यांच्या जवळच्या नातलगांना चिंता लागून राहिली. नरक्यांना कलकत्ता व ब्रम्हदेशासारख्या दूर दूर ठिकाणी भूगर्भशास्त्रविषयक पहाणी करण्याच्या कामासाठी जावे लागे. सहाजिकच त्यांच्या आईला अशी इच्छा झाली की आपल्या मुलाला जवळपास चांगली नोकरी मिळावी. बाबांनी उत्तर दिले, मी त्याच्या कामाची कायमची सोय पुण्यात करेन."

नरक्यांना काहीं वेळा अनेक कामे सांगून येत व त्यात निवड करावी लागे. अशा प्रत्येकवेळी ते बाबांकडे जात व त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे ठरवीत. बाबांची

निवड पुष्कळ वेळा विचित्र दिसे. एकदा नरक्यांना कलकत्ता व ब्रम्हदेश या दोन ठिकाणांहून बोलावणे आले आणि बाबांनी ब्रम्हदेशाची निवड केली. अशावेळी बाबा नेहमी म्हणत, "ब्रम्हदेशाला व पुण्याला जा" किंवा "अमुक ठिकाणी आणि पुण्याला जा." बाबा प्रत्येकवेळी पुण्याचे नाव निवडलेल्या ठिकाणाला जोडत. १९१६ साली नरक्यांना बनारस हिंदु युनिव्हर्सिटीकडून प्रोफेसरची कायमची नोकरी सांगून आली. त्याचवेळी ब्रम्हदेशाहून कॉन्ट्रॅक्टवर काम मिळत होते. तेव्हांही बाबा म्हणाले, "ब्रम्हदेशाला जा व पुण्याला जा." प्रत्येकवेळी बाबा पुण्याची पुस्ती जोडत तेव्हां नरक्यांना मनातल्यामनात हसू येई. कारण नरके खाणीचे इंजिनियर होते व पुण्यात तसे काहीं काम मिळण्याचा संभव नव्हता. परन्तु १९१८ साली नरक्यांना भूगर्भशास्त्र व रसायनशास्त्राचे प्राध्यापक म्हणून पुण्याच्या इंजिनियरिंग कॉलेजमध्ये कायमची नोकरी मिळणार होती हे बाबांना अगोदरच ठाऊक होते. त्यांच्या आयुष्याचा सर्व भविष्यकाळ बाबांना वर्तमानकाळासारखा दिसत होता. १९१७ मध्ये पुण्याच्या इंजिनियरिंग कॉलेजच्या भूगर्भशास्त्राच्या प्राध्यापकाच्या जागेची जाहिरात प्रसिद्ध झाली. त्या जागेसाठी अर्ज करावा का, असे बाबांना नरक्यांनी विचारताच त्यांना होकार मिळाला. नरक्यांना मुलाखतीसाठी बोलाविण्यात आले. प्रस्तुत जागेसाठी बऱ्याच लोकांनी अर्ज केले होते, व त्यातल्या काहींचा उत्तम वशिला होता. नरके पुण्याला मुलाखतीसाठी गेले. बाबांनी सांगितल्याप्रमाणे त्यांना यश मिळाले.

मृत्युचे भय कोणास वाटत नाही? आणि त्यातून प्लेगची साथ असली तर मग काय विचारू नका. माणसे पटापट साथ लागून मृत्युच्या मार्गाने जातात. अशीच प्लेगची साथ १९१६ साली शिरडीत आली. त्यावेळी नरके शिरडीत आले असताना बाबांनी त्यांना नैवेद्यानिमित्त मिठाई आणण्यासाठी हलवायाकडे पाठविले. मिठाईच्या दुकानात हलवाई मरून पडला होता व त्याची बायको शोक करीत होती. बाबांचा निरोप तिला सांगताच तिने प्रेताकडे बोट दाखवून नरक्यांना स्वतः कपाटातून मिठाई काढून घेण्यास सांगितले. आपल्याला व दुसऱ्यांना प्लेग जडेल या भीतीने कापत कापत नरक्यांनी कपाटातून मिठाई काढली व ती बाबांकडे घेऊन गेले. त्यावेळी बाबा त्यांना म्हणाले, "तुला वाटतं की तू शिरडीहून दूर गेलास तर वाचशील व येथे राहिलास तर मरशील. हे खरे नव्हे. ज्याची घडी आलेली आहे तोच काळाच्या मुखी पडेल. ज्याची गाठ बळकट आहे तोच जगेल." अशाच तऱ्हेचा उपदेश एकदा कॉलराची लागण

शिरडीत असताना बाबांनी त्यांना केला होता. बाबांच्या त्रिकालज्ञानाची अशी अनेक उदाहरणे आहेत पण आता दुसऱ्या विषयाकडे वळू.

प्रथमपासून नरके बाबांकडे चिकित्सकपणे पहात होते हे बाबांना ठाऊक होते. या जिज्ञासू वृत्तीस बाबा नेहमी उत्तेजन देत व नरके जेव्हां स्वतःहून काही गोष्ट ओळखत तेव्हां बाबा त्यांना शाबासकी देत. परंतु काहीं वेळा नरके संभ्रमात पडत व त्यांना काही आकलन होत नसे तेव्हा बाबा त्यांना 'हातरे वेड्या' म्हणून प्रेमानं टोमणा मारत व अधिक सावध राहण्याचा इशारा देत. कोणाचीही प्रामाणिक जिज्ञासा बाबांनी कधीही दाबून टाकली नाहीं. ते जे काही करत त्यात गर्भित अर्थ असे. पारमार्थिक वस्तूचे मर्म शोधून काढणारा महाभाग बाबांकडे आल्यास त्याला बाबा आपल्या अमोल धनातून घेणाऱ्याच्या कुवतीप्रमाणे व अधिकारानुसार ज्ञान देत.

बाबांची सूक्ष्म दृष्टीने चिकित्सक पहाणी व तपासणी केल्यावर ही आश्चर्याची गोष्ट नरक्यांच्या लक्षात आली की, बाबा पृथ्वीतलावर वास करत असता एकाचवेळी दुसऱ्या जगात अदृश्य स्वरूपात राहून व्यवहार करत होते. अशा वेळी जे काही सांकेतिक भाषेत दृष्टांतरूप कथेत अथवा रूपकात ते बोलत ते उथळ लोकांना निरर्थक बडबड आहे असे भासे. बाबा पक्के संसारी वृत्तीचे असून लोभी आहेत असे शाब्दिक अर्थ करणाऱ्याचे मत होई. परंतु अंदरकी बात निराळीच असे. उदाहरणार्थ अशाच एका माणसाला बाबांच्या विषयी त्याचे काय मत झाले असे विचारले असता तो म्हणाला "चोवीस तास पैसा पैसा करणारा साईबाबांसारखा दुसरा साधू मी पाहिला नाहीं! त्यांनी माझी फार निराशा केली!" पैका हा शब्द पुण्य या अर्थी बाबा वापरत हे या गृहस्थास उमगले नाहीं.

नरके असे पण म्हणतात की, दूरदूरच्या देशात अदृश्य रूपाने प्रवास करण्याची व पृथ्वीशिवाय दुसऱ्या लोकात भ्रमण करण्याची व तेथील परिस्थितीवर सत्ता चालविण्याची साईबाबांजवळ सिद्धी व सामर्थ्य होते.

बाबांच्या सान्निध्यात राहून त्यांचे जवळून चिकित्सक दृष्टीने निरीक्षण केल्यावर नरक्यांचे असे निश्चित मत झाले कीं, साईबाबांचा स्वभाव, सिद्धी व सामर्थ्य अद्भूत होते, आणि माणसांना सहाय्य व मार्गदर्शन करण्याची त्यांची पद्धत विलक्षण होती.

(नवशक्तीवरून साभार)

# जन्म कर्म च मे दिव्यम्

(भगवद्गीता अध्याय ४, श्लोक ९)

–श्री अनंत जयदेव चितांबर
तांबे ब्लॉक्स, दिल्ली दरवाजाजवळ
मु. अहमदनगर, ४१४ ००१.

• भगवान् श्रीकृष्णांनी अर्जुनास कर्मयोगाचे आचरण करण्याचा उपदेश केला तो भगवद्गीतेच्या ३ ऱ्या अध्यायात आलेला असून ह्या कर्मयोगाचे अधिक स्पष्टीकरण गीतेच्या ४ थ्या अध्यायात आलेले आहे. हे स्पष्टीकरण सुलभ करताना भगवान् श्रीकृष्ण सांगतात की, "हे अर्जुना हा कर्मयोग मी पूर्वी विवस्वत सूर्याला सांगितला. विवस्वत सूर्याने तो मनूला सांगितला. मनूने इक्ष्वाकूला सांगितला. अशा परंपरेने हा कर्मयोग राजर्षींनी जाणला, आणि ह्या पृथ्वीतलावर बऱ्याच काळानंतर हा कर्मयोग लुप्त झाला. अर्जुना, तोच पुरातन कर्मयोग मी आज तुला सांगितला. कारण तू माझा भक्त आहेस आणि तसाच प्राणप्रिय मित्रही आहेस. शिवाय, हा कर्मयोग हे एक अत्युत्तम रहस्य आहे."

भगवंताच्या ह्या सांगण्यावर अर्जुनाचा एकदम विश्वास बसेना. अर्जुनाने श्रीकृष्णपरमात्म्यास आपली शंका स्पष्ट विचारली. अर्जुन म्हणाला, 'हे श्रीकृष्णा विवस्वत सूर्य हा फार जुन्या काळातला, आणि तू तर अगदी अलीकडचा. असे असताना तू हा योग पूर्वी सूर्याला सांगितला असे मी कसे समजू." ह्या अर्जुनाच्या शंकेवर भगवान श्रीकृष्ण म्हणाले, "अर्जुना, तो सूर्य ज्यावेळी होता, त्यावेळी मी नव्हतो अशी तुझ्या चित्तात भ्रांति निर्माण झाली आहे. अरे, तुझे व माझे बरेच जन्म होऊन गेले मला ते स्मरतात पण तुला ते आठवत नाहीत. अरे, मी भक्तांच्या रक्षणासाठी आण दुष्टांचा संहार करण्यासाठी, आणि धर्माची संस्थापना करण्यासाठी मी युगायुगांच्या ठिकाणी अवतरतो,

भगवान् श्रीकृष्ण वरीलप्रमाणे आपल्या अवतारांचे उद्दिष्ट सांगत असून, त्यांनी वेळोवेळी घेतलेले सर्व अवतार जन्म त्यांना आठवतात एवढेच म्हणून थांबत नाहीत, तर त्यांच्या जन्माचे व कार्याचे वैशिष्ट्यही पुढे ते सांगत आहेत. ते वैशिष्ट्य असे :–

जन्म कर्म च मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्त्वतः ।
त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन ।।

(गीता अध्याय ४ श्लोक ९)

वरील श्लोकांत भगवंतानी त्यांचा जन्म व कर्म हे दिव्य आहे, असे स्पष्ट केले असून हे दिव्य कसे हे जो भक्त तत्त्वतः जाणतो तो पुनर्जन्म पावत नाही, तर तो मला येऊन मिळतो असे भगवान् श्रीकृष्ण सांगतात.

वरील विवेचनावरून कळून येईल कीं, ईश्वर अजन्मा व अकर्ता असताना त्याचा जन्म आणि कर्म तत्त्वतः दिव्य कसे? हे भक्ताने समजावून घेणे आवश्यक ठरते. हे ज्ञान असणारा भक्त माझ्याकडे येतो. त्यास पुनर्जन्म नाहीं. असे खुद्द भगवंत सांगत आहेत. यावरून त्याचे महत्त्व लक्षात येते.

या बाबतीत श्रीज्ञानेश्वर माऊली ज्ञानप्रकाश करतात :–
ज्ञानेश्वरी अध्याय ४ ओवी ५८ व ५९ :–

माझें अजत्वें जन्मणे । अक्रियताचि कर्म करणे ।
हे अविकार जो जाणे । तो परममुक्त ।।५८।।
तो चालिला संगें न चले । देहीचा देहीं नाकळे ।
मग पंचत्वी तंव मिळे । माझ्याचि रूपी ।।५९।।

"मी अवतरतो" असे भगवान् श्रीकृष्ण सांगतात. यावरून ईश्वराचा जन्म म्हणजे तो निराकार असूनही भक्तांच्या उद्धारासाठी स्वतःच्या आत्ममायेच्या योगाने त्याने साकार स्वरूप धारण करणे होय. वस्तुतः ईश्वर जन्मरहितच आहे. मायेच्या योगाने तो जन्मला असे दिसते मात्र ईश्वराचे कर्म म्हणजे त्याचे अवतार कार्य होय. ईश्वर मायातीत, मायेचा नियंता, स्वतंत्र अविनाशी, पूर्ण, स्वयंप्रकाश, सर्वशक्तिमान, सर्वव्यापी नित्य असा असून तो करुणासागरही आहे. ईश्वराची दैवी गुणमयी माया मात्र प्राण्यांना भुलविणारी आहे. मायेच्या गुणांच्या आधीन मानव असल्याने परमात्म्याचे मूळ स्वरूप त्याच्या दृष्टीपथात येत नाहीं. यावर ईश्वरास शरण जाण्याखेरीज दुसरा उपाय मानवाजवळ नाहीं. म्हणून प्रार्थना :–

कृष्णनाथा दत्ता साई । जडो चित्त तुझे पायीं ।।

श्रीसाईनाथ महाराज हे साक्षात् ईश्वराचे अवतार आहेत. ते साधेसुधे संत नव्हेत. ते संतांचेही आश्रयस्थान व देवाधिदेव आहेत. त्यांचा अंत कोणासही समजलेला नाही असे म्हणणे भाग पडते. आपापल्या मतानुसार त्यांचा जन्म व कर्म ठरविणे हे कसे अज्ञानमूल्य ठरेल. हे समजुतीत पटण्यासाठी भगवद्गीतेच्या व ज्ञानेश्वरीचा वरीलप्रमाणे आश्रय घेतला आहे. श्रीसाईबाबा सच्चरितात त्यानी अनेक माणसांचे व प्राण्यांचेही मागील जन्म भक्तांना सांगितले आहेत. बाबांचे अवतारकार्य त्यांच्या भक्तांच्या पुढे अनुभवाने प्रकटच आहे. हाताच्या कंकणाला आरसा कशाला? पण दृष्टि भक्तिप्रेमाने युक्त असली तर श्रीसाईबाबा भक्तांच्यासाठी काय करीत नाहीत? त्यांचे अवतार घेणे व अवतारकार्य विकाररहित असून त्यांचे पायी दृढ भावना वाढविणारे आहेत. ते अखिल मानवजातीच्या उद्धारासाठीच अवतरले आहेत. ईश्वर हा विशिष्ट पंथाची अगर धर्माची मालमत्ता आहे काय? मनात इतर मानवांबद्दल असूया, द्वेष, त्यांचे अहित करण्याची बुद्धी या गोष्टी राखून ठेवून ईश्वराची प्राप्ति होऊ शकते काय? मनुष्य किती आंधळा झाला आहे! ईश्वराचे खरे स्वरूप न जाणता ईश्वर भेटेल काय? कोणत्याही धर्माचा मनुष्य, पंथाभिमान वर्जित होऊन साईबाबांच्याकडे आकर्षित होतो, यापेक्षा अतर्क्य लीला कोणती असू शकते?

म्हणून, श्रीसाईनाथ महाराजांचा 'जन्म व कर्म' ह्या दोन्हीही गोष्टी भगवद्गीतेच्या वरील श्लोकात उद्धृत केल्याप्रमाणे 'तत्त्वतः दिव्य' आहेत ह्या दृष्टिकोनातून सद्गुरुला शरण जाऊन समजावून घेण्याची आवश्यकता.

जयाचे केलिया स्मरण । होय सकलविद्यांचे अधिकरण ।
तेचि वंदू चरण श्रीगुरुचे ।। (ज्ञानेश्वरी अध्याय १३–१)

ओम् तत् सत् । श्रीसद्गुरुसाईनाथार्पणमस्तु ।।

卐

# सर्वांभूति आत्मा एकच !

श्री बाळकृष्ण देसाई,
१५१ गोखले रोड,
भांगरवाडी, लोणावळा.

(१) विठ्ठलपंतानी आळंदीच्या ब्रम्हवृन्दांनी सांगितलेले देहांत प्रायश्चित्त घेण्याचे ठरवून एके रात्री त्यांची चारी बालकं गाढ झोपेत असता आपली पत्नी रुक्मिणीबाई हिच्यासह झोपडीतून बाहेर पडले, नि त्यांनी प्रयाग क्षेत्री जाऊन गंगेत देहार्पण केलं.

निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ता ही चारी भावंड जगात पोरकी झाली. आकाश फाटलं. त्यांच छत्र नाहीसं झालं. ब्रम्हवृन्दाकडे जाऊन त्यांनी यावर मार्ग विचारली. तेव्हां ब्रम्हवृन्द त्या बालकांना म्हणाले, "तुम्ही संन्याशाची मुलं. पैठण हे दक्षिणेकडच धर्मपीठ आहे. तिथं जा नि त्या पीठाकडून शुद्धिपत्र घेऊन या. म्हणजे तुम्हांला आमच्यात घेता येईल!"

ब्रम्हवृन्दांच्या सांगण्यावरून ती चारही बालकं अनवाणी पैठणला निघाली. वाटेत प्रत्येक गावी त्यांना गावकऱ्यांच्या छळाला तोंड द्यावे लागत होते. लहानगी मुक्ता पाय वाटेने चालत असता जाग जागी तिच्या नाजुक कोवळ्या पायांना काटे बोचत व दगड रुतत होते. तिचे ते रडवेलं तोंड पाहून ज्ञानदेव तिला पाठंगळीला मारीत. असे त्यांचे खडतर प्रयाण चालल होतं. शेवटी पंधर-वड्यानी एकदाचं त्यांनी पैठण गाठलं. पैठणला त्याकाळी दक्षिण काशी समजत असत.

चारी लेकरं पैठणच्या विद्वान् पंडितांपुढं जाऊन उभी राहिली. तेव्हां ब्रम्हवृन्दांची सभा भरून विचार विनिमय झाला, नि शेवटी संन्याशाची मुलं कळताच त्यांना शास्त्रात कुठेच प्रायश्चित्त नसल्याचे सांगण्यात आले.

मुलांना ब्राम्हणांचा निर्णय मान्य झाला. पण त्यातील टवाळखोर विद्वानांनी त्यांची नावं विचारली. ज्ञानेश्वरानी आपलं नाव 'ज्ञानदेव' सांगितलं. "अरे, आमच्याकडे एकाचं रेड्या नाव 'ज्ञानदेव' आहे. तेव्हां त्याचा नि तुझा आत्मा एकच असला पाहिजे!"

"होय! एकच आत्मा! शिवाय सर्वांभूति परमेश्वरही एकच!"

"अस्सं होय! पाहूया! त्यांनी वाटेनं जाणाऱ्या एका रेड्याच्या पाठीवर चाबकाचे फटकारे लगावले. नि काय आश्चर्य! ज्ञानदेवांच्या पाठीवर त्याचे वळ उठलेले सर्वांनी पाहिले. तरी कुणी ज्ञानदेवांच्या म्हणण्यावर विश्वास ठेवीनात. दुसरे काही म्हणाले, "तुम्हा दोघांचा आत्मा जर एकच, तर ह्या रेड्याच्या मुखानं वेद बोलव पाहू!"

ज्ञानदेवांनी रेड्याच्या पाठीवर हात ठेवून म्हटलं, "ज्ञान्या मी म्हणतो ती वेदमंत्र म्हणून ह्या विद्वानांना ऐकव बाबा!" अन् काय आश्चर्य, तो मुका पशु न अडखळता धडाधड वेदमंत्र म्हणू लागला. हे पाहून त्या सर्वांचा अभिमान गळाला, अन् त्या सर्वांनी ज्ञानदेवांना साष्टांग नमस्कार घातला.

(२) एकनाथ सिद्धि प्राप्त झालेले जनार्दन स्वामींचे श्रेष्ठ शिष्य! जनार्दन स्वामींनी त्यांना अनेकदा भगवान दत्तात्रेयांच दर्शन आपल्या शेजारी बसवून घडविलं होत.

एकदा नाथ उद्धव वगैरे आपल्या शिष्यांसह काशीची गंगा कावड भरून रामेश्वरावर अभिषेकासाठी नेत होते. विंध्य, सातपुडा, दंडकारण्य ओलांडून ती सर्व मंडळी रामेश्वराच्या अगदी नजीक आली. इतक्यात भर दुपारच्या त्या भयंकर उष्णाघातानं तहानेनं व्याकुळ झालेलं एक गाढव रेताड मैदानावर पाय झाडीत गडबडा लोळत असलेलं नाथांच्या दृष्टीस पडलं.

नाथ गहिवरले. खांद्यावरील कावडीसह ते तिथे धावले. नि त्यांनी त्या गाढवाच्या तोंडात गंगाजल ओतून त्याला ताजेतवाने तर केलेच, पण जीवदानही दिले.

नाथांचं हे करणं इतरांना आवडलं नाही. ते म्हणाले, "नाथ, रामेश्वरावर अभिषेक करून मिळणार पुण्य गमावून बसलात! काय केलत हे! किती श्रमानं हजारो मैलांचा रस्ता तुडवून येथवर आलो, नि तुम्ही आपल केलं भलतच!"

"नाहीं, भलतच नाही केलं मी! गाढवाच्या रूपानं प्रत्यक्ष रामेश्वरच होता तो! बाबांनो, गाढवाचा नि इतर प्राणिमात्राचा आत्मा एकच! परमेश्वर नाहीं अशी एकही जागा वा वस्तु नाहीं. प्राण्याला प्राण असतो, नि प्राण म्हणजे

आत्मा म्हणजेच परमेश्वर! सर्वभूति एकच परमेश्वर असतो, हे विसरून कस चालेल? मी केल ते योग्यच होत अस अजूनही तुम्हांला नाही का पटत?"

(३) आपले साईबाबा असेच होते. भिक्षेला फिरून मिळविलेले अन्न भाकरीचे तुकडे ते आपल्या उघड्या दगडी कटोऱ्यात ठेवीत. नि जशी खाण्याची इच्छा होई तेव्हां थोड थोडे खात.

आजूबाजूला फिरणारी कुत्री, मांजर, कावळे, चिमण्या हेही प्राणी त्यातील तुकडे पळवित नि आपल पोट भरीत. पण बाबा प्रत्यक्ष पाहूनही त्याना कधीच हाकलून लावीत नसत. स्वतःला भूक लागली की त्यातलेच तुकडे खाऊन नि पाणी पिऊन भूक भागवित असत.

लोक बाबांना विचारीत, "बाबा, कुत्र्या मांजरांनी उष्टावलेले तुकडे तुम्ही खाता, तेव्हां तुम्हाला ते ओंगळ, घाणेरडे नाही का वाटत?"

"कुत्रा, मांजर किंवा कावळे चिमण्या झाल्या तरी ते सारे प्राणीच आहेत. त्यांचा नि आपला आत्मा एकच! त्यांच्या शरीरात वास करणारा ईश्वर आपल्याही शरीरात तोच आहे. मग त्यानी उष्टावलेल अन्न म्हणजे एकाच आत्म्याने उष्टावलेल वाईट, घाणेरड, ओंगळ कस काय ठराव? आपण हा जो भेद मानतो तेच आपल अज्ञान होय!"

यावर विचारणारे निरुत्तर होत. हीच बाबांची समता नि समदृष्टि. त्यांना माणसा माणसांतील जातिभेद, पंथभेद, उच्चनीचता बिलकूल पसंत नव्हती. सर्व प्राणी एकच हा त्यांचा धर्म होता. म्हणूनच कुणाही भक्ताला ते आपल्या कटोऱ्यातील अन्न, तुकडे प्रसाद म्हणून देत असत. भक्त हात पुढे करायला काचरत तेव्हां बाबा भगवद्गीतेतील पुढील आधार देत. भगवान अर्जुनाला सांगतात, "न जायते म्रियते वा कदाचिन्नायं भूत्वा भविता वा न भूयः।

अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते हन्यमाने शरीरे ।।अ २–२०।।"

श्रीबाबांच्या वरील निवेदनाने त्यांच्या मनातील गोंधळ नाहीसा होई नि बाबा देत असलेला प्रसाद ग्रहण करीत.

थोरांच्या मनात आपपरभाव, उच्चनीचता, गरीब श्रीमंत हा भेद कधीच डोकावत नसतो. त्यांना सर्व सारखे वाटत असतात. हा त्यांच्या जीवनातील गाभा आपण समजून घेतला पाहिजे.

☆

# खरोखरच ही साईकृपा


सौ. स्वाती सुधाकर जयकर
डहाणूकरवाडी
कांदिवली (प.)

शरण मज आला आणि वाया गेला
दाखवा दाखवा ऐसा कोणी ।।

खरोखरच साईवचने जी आहेत त्याचा सतत आपणास अनुभव चांगलाच येतो. साईला आपण पूर्णपणे शरण गेलो तर ती शरणागती कधीच वाया जात नाही. आमच्याकडे तर सदोदित हा अनुभव येत राहिला आहे. माझ्या माहेरी साईबाबांचे सर्वच भक्त. बाबांच्या म्हणण्याप्रमाणे श्रद्धा आणि सबूरी ही दोन्ही वचने आम्ही विश्वास ठेवून आहोत. त्यामुळे त्याचे फळ आज ना उद्या आम्हांला मिळते. माझी धाकटी बहिण हिला कॉलेजमध्ये जायला वेळ नसल्यामुळे तिच्या मनात सतत कॉलेजमध्ये जाऊन पदवी घ्यायची असे होते. परंतु तिला ते जमत नव्हते. बरं तिची ड्युटी पण नर्स असल्यामुळे सकाळ संध्याकाळ केव्हांही असे. तेव्हां ती जरा चिडलीच होती. व आता काही आपण पदवी घेऊ शकत नाहीं असे तिला वाटत होते. परंतु बाबांच्या म्हणण्याप्रमाणे सबूरी धर सर्व काहीं व्यवस्थित होईल असे मी तिला सांगितले तेव्हा ती शांत होऊन साईबाबांना

पूर्णपणे शरण गेली व म्हणाली की माझे शिक्षण आता तुमच्याच हाती, व खरोखरच आपली ड्यूटी सांभाळून साईच्या कृपेने वेळच्या वेळी परीक्षेचे फॉर्म भरून असा जमेल तसा अभ्यास करून ती आज बी. ए. च्या शेवटच्या वर्षाला आहे. खरोखरच ही साईकृपा.

त्याचप्रमाणे एकदा संध्याकाळी माझ्या सोन्याच्या कुडीचे मळसूत्र सैल होऊन ते कुठचे कोठे पडले सर्व ठिकाणी शोधले परंतु संध्याकाळ पावसाळी दिवस त्यामुळे ते मिळणे कठीणच. मी अगदीच कष्टी झाले कारण आज १ ग्रॅम सोने म्हटले तरी किती किंमत. शेवटी निराश होउन घरी आले व बाबांच्या पुढे (फोटोसमोर) उभी राहिले. व मनोमन विनवले व सांगितले जर ते कुडे मिळाले तर मी हा अनुभव साईलीलेत देईन. त्याचप्रमाणे तुपाची वात फोटो-
मिळाले तर मी हा अनुभव साईलीलेत देईन. त्याचप्रमाणे तुपाची वात फोटो-समोर लावीन. एवढे बोलून पुन्हा रस्त्यावर आले व शोधाशोध केली. आणि काय आश्चर्य! माझ्या बरोबर माझ्याकडे काम करणारी मुलगी होती ती पण शोधण्यास मदत करत होती. ती म्हणाली ताई ते बघ काय आणि खरोखरच गटारात ते कुड सापडल. मला अतिशय आनंद झाला. घरी आले व बाबांच्या फोटोपुढे उभी राहून मनोमन नमस्कार केला तुपाची निरांजन लावली. अशीच बाबांची कृपा राहो ही इच्छा.



# बीदर ( कर्नाटक ) संतांचं कसोटी स्थान

श्री. लक्ष्मण बापूराव रापतवार
रिटायर्ड ड्राफ्समन किल्ला वॉटर वर्क्स, नांदेड

• बीदर हे मोगलाईतले जिल्ह्याचे स्थान. तेथे निजामशाही पर्यंत मुसलमानाची राज्यसत्ता होती. पूर्वी ती मोगलबादशहाची राजधानीही होती. तेथे अनेक मसलमान सरदारानी राज्य केल्यामुळे तेथील मुसलमानामध्ये इस्लामी धर्माबद्दल स्वाभिमान असणे स्वाभाविक आहे. तसे पाहता प्रत्येक धर्मातल्या लोकांना आपल्या धर्माबद्दल आदर राहतोच परंतु फक्त आपलाच धर्म श्रेष्ठ हे म्हणणे द्वेष भावनेचे व मत्सर बाळगण्याचे प्रतीक असते. सर्वच धर्मात परमेश्वर एक व आपण सर्व जाती जमातीतील लोक आपसात भाऊ भाऊ आहोत. सर्वांबद्दल आदर बाळगणे व समदृष्टीने पाहणे हेच सर्व संताची शिकवणूक असते.

मुसलमानाच्या राजवटीत बीदर शहरातल्या करंटक राज्यकर्त्यांनी अनेक संतांची छळणूक केलेली आहे. कान्होपात्राने एका वेश्याच्या पोटी मंगळवेढ्यात जन्म घेतला ती अतिशय सुंदर होती ती गायन व नृत्य कलेतही अग्रगण्य झाली. तिच्या आई शामाने तिला राज दरबारी नेण्याचा प्रयत्न केला. कारण त्यावेळचा नवाब आपणास पुष्कळ धन संपत्ती व जहागिरी देईल अशी तिची अभिलाषा होती. परंतू कान्होपात्रा राज दरबारी न जाता संतमंडळी बरोबर पंढरपूरास पांडुरंगाच्या दर्शना करता आली व पांडुरंगांची मूर्ती पाहून ती पूर्व पुण्याईमुळे भारावून गेली. व तेथेच महाद्वारी बसून दररोज अती मधुर व सुंदर स्वरात भजन करू लागली. काही दुष्ट लोकांना वाटले की ही वार्ता नवाबास सांगितल्यास तो खुष होऊन आपणास काही इनाम देईल म्हणून ते बीदरास आले व नवाबास सांगितले की तुमच्या दरबारी शोभेल अशी अती सुंदर युवती आपल्या मधुर आवाजाने भजन करीत पांडुरंगाच्या देवस्थानी महाद्वारी बसली आहे. बाबा ही वार्ता ऐकताच त्याच्या तोंडास पाणी सुटले त्यांनी तावडतोब कान्होपात्रास पकडून आणण्यास घोडेस्वार शिपायांना पाठविले. घोडेस्वारांनी कान्होपात्रास सांगितले की तुला नवाबाने राज दरबारी बोलावले आहे. तेथे तू राणीसारखी राहशील येथे भिकाऱ्यासारखी बसून काय उपयोग होणार आहे. ह्यावर ही जर त्वा नकार दिला तर आम्ही तुला बळजबरीने उचलून नेऊ.

ती मनात खिन्न झाली व मी आताच देवाचे दर्शन घेऊन येते तुम्ही थोडे थांबा म्हणून देवळात जाऊन पांडुरंगास प्रार्थना करू लागली की, हे देवा, मी तुझी भक्तीण आहे जर मला शिपायाने पकडून नेले तर लोक तुलाच नाव ठेवतील. गजेंद्राची करुणा ऐकून तू सत्वर पावलास. मंडूक बाळास कढईत टाकताच तू पावन झालास. आजामीळ व चोखामेळा यांचा त्वा अंगीकार केला आता मी वेश्याच्या पोटी जन्मास आले म्हणून का तू मला दूर लोटत आहेस. कान्होपात्राची करुणा ऐकून देवाने तत्काळ तिचे प्राण आपल्यात सामावून घेतले व विशेष म्हणजे तिचे प्रेत दक्षिण द्वारी नेऊन पुरले त्या बरोबर तेथे एक वृक्ष उगवला. राजाचे शिपाई बाहेर तिष्ठत उभे होते त्यानी पुजाऱ्यांना विचारले कान्होपात्रा कुठे आहे त्यावर पुजाऱ्यांनी खरी हकिकत सांगितली की तिचे प्राण गेले व पुरल्या ठिकाणी प्रेतातून झाड उदयास आले. शिपायांना वाटले की पुजाऱ्यांनी तिला तुरुंगातून कोठे तरी लपवून टाकले असावे म्हणून त्यानी सर्व पुजाऱ्यांना पकडून बीदरात राज दरबारी उभे केले. राजाने विचारले की कान्होपात्रा देवात कशी मिळाली तेव्हां पुजाऱ्यांनी सांगितले की मीठ समुद्रात मिसळते त्याप्रमाणे ती पांडुरंगात विलीन झाली आहे. पुजाऱ्यांनी प्रसाद म्हणून नारळ बुक्का आणला होता त्यात अती सुंदर केस राजास दिसला त्यांनी विचारले की हा केस कुणाचा आहे. त्यावर पुजाऱ्याना काही सुचेना म्हणून त्यांनी घाबरून हा पांडूरंगाचाच केस आहे म्हणून सांगून टाकले. नवाब स्वत: सर्व बंदिस्त पुजाऱ्यांसह साक्ष पाहण्यास पंढरपुरास निघाला. पुजाऱ्यांनी पांडूरंगाचा मनातल्या मनात एक सारखा धावा सुरू केला की देवा, जर नवाबास तुझ्या डोक्यास केस दिसले नाहीत तर तो आमचा प्राण घेईल. आम्ही खोटे बोललो परंतू तूच आता आमचे रक्षण कर. नवाबसाहेब महाद्वारी येताच कमरेवर हात ठेवलेली पितांबरधारी कुरळे केस असणारी मुकूट सूर्यासमान झळकत असलेली दिव्य मूर्ति त्यास दिसली. तो देहभान विसरला व हात जोडून पांडुरंगास साष्टांग दंडवत घातले. सर्व बंदिस्त पुजाऱ्यांना सोडून देण्यात आले. नवाबाने प्रत्यक्ष दक्षिणद्वारी उगवलेले तरटी वृक्ष पाहिले व कान्होपात्रा खरी देवाची भक्तीण होती आम्ही तिची विनाकारण छळवणूक केली म्हणून त्यास पश्चाताप झाला.

पंढरपूराजवळ असलेल्या ह्याच मंगळवेढ्या गावात दामाजी पंतानी दुष्काळग्रस्त लोकांचे प्राण वाचविण्याकरिता सरकारी धान्याचे कोठार लुटविले. व गोरगरीब लोकांचे प्राण वाचविले. सर्व गोरगरीब जनता दामाजीपंतांचा जयजय-

कार करू लागली. त्याची कीर्ती एका दुर्जन कानडी ब्राम्हण मुजूमदारास सहन झाली नाहीं. त्याने बीदरच्या बादशहास पत्र लिहून सरकारी कोठारातील सर्व अन्न धान्य दामाजीपंताने लुटवून टाकून सरकारचे अतोनात नुकसान केल्याचा वर्तमान कळविले. बादशाह क्रोधायमान झाला व त्याने आपल्या दूतांना दामाजी पंतास पकडून आणण्यास पाठविले. बादशहाचा विचार दामाजीपंतास प्राणदंडाची शिक्षा द्यावयाची होती. दामाजीपंतासही पुढे काय होणार हे माहित होते. परंतू तो दयाळू भक्त असल्यामुळे त्याला भूकेल्या लोकांचे हाल देखवले नाहींत. त्यास वाटले होते की माझा एकट्याचा प्राण जाईल परंतू हजारो लोकांचे प्राण वाचतील म्हणून त्यांनी हे कृत्य केले होते जो अपराधी होता त्यास माहितच होते. असो, तो दूताबरोबर बीदरास जाण्यास निघाला रस्त्यात त्याने डोळेभरून पांडुरंगाचे दर्शन घेतले. देवास चिंता वाटली की मी भक्त कैवारी आहे. माझ्या प्रिय भक्तास शिक्षा झाल्यास मलाच उणेपणा येईल म्हणून पांडुरंगाने वेसकराचे, रूप धारण केले. फाटक्या चिंध्या डोक्यास लपेटले व हातात काठी घेऊन बादशहाच्या दरबारी पोहचले. मी विठू नाईक दामाजी पंताचा चाकर आहे त्यांनी हे पत्र व रक्कम हुजूरांस देऊन येण्यास आज्ञा दिली म्हणून सांगितले. पत्रातील मजकूर वाचून बादशाह खुष झाला त्यात लिहिले होते की दुष्काळामुळे धान्याचे भाव बरेच वाढले होते. सरकारचा फायदा व्हावा म्हणून मी ते विकून टाकले व दुप्पट रक्कम वसूल करून खजिन्यात जमा करण्यास पाठवित आहे. थैली लहान दिसत होती. म्हणून वजीराने बादशहास सांगितले की धान्याची एकूण रक्कम एक लक्ष अडुसष्ट हजार रुपये होती. त्यावर विठू नाईकाने रक्कम मोजून घेऊन पावती देण्याची विनंती केली. सर्व वजीर रक्कम मोजू लागले एकलक्ष अडूसष्ट हजारा पेक्षा कितीतरी पटीने ती रक्कम जास्त होती. रक्कम मोजता मोजता सर्वांचे हात दुखु लागले. बादशहाने तशीच थैली खजिन्यात टाकन देण्यास व पावती देऊन टाकण्यास आज्ञा दिली. पावती घेऊन विठू नाईकरूपी पंढरीनाथ चालते झाले. तितक्यात बादशाहच्या दूतानी दामाजी पंतास बादशहा समोर उभे करताच बादशाह स्वतः पुढे आला व त्याने दामाजी पंतास अलिंगन दिले. आताच तुमच्या विठू नाईकाने रक्कम पटवन पावती घेऊन गेल्याचे वर्तमान सांगितले. "तुमने हमारा बहोत बडा फायदा किया है हमने मुजुमदारको नौकरीसे निकाल दिया है" म्हणताच दामाजीपंतास आश्चर्य वाटले. त्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रु वाहू लागले, की पांडुरंगाने माझ्या करता विठू नाईकाचे रूप धारण करून भक्तांचे संकट टाळ-ण्याकरिता कष्ट सोसले म्हणून तो गहींवरून आला होता. बादशहास व त्याच्या वजीरास हा काय प्रकार आहे म्हणून अचंबा वाटला तेव्हां दामाजी पंताने

सांगितले की मी कोणासही पाठविले नव्हते. माझ्याजवळ एवढी रक्कम कोठून येणार साक्षात् पांडूरंगाने विठू नाईकाचे रुप धारण करून माझी अब्रू वाचविली तेव्हा सर्व विचारात पडले की खरोखरीच एक लक्ष अडुसष्ट हजारापेक्षा किती तरी पटीने जास्त रक्कम एकटा मनुष्य कसा उचलू शकेल. व तेवढी रक्कम एका थैलीत कशी सामाऊ शकेल. राजाने दामाजी पंताचे आभार मानले की तुझ्यामुळे आम्हास देवाचे दर्शन घडले. दामाजीपंताने नोकरीचा राजीनामा दिला व शेवटपर्यंत लेकरा बाळासह पंढरपूरात पांडुरंगाचे गुणगाण गात राहिला. बीदरच्या बादशहाने ही वेळोवेळी दामाजी पंताची भेट पंढरपूरास जाऊन घेतली.

एकदा हुमणाबादचे माणिक प्रभू बीदरला काही भक्त मंडळीसह गेले व गावाबाहेरच त्यांनी आपला कॅम्प केला. माणिक प्रभूची किर्ती चोहोकडे पसरली असल्यामुळे गावातील हिंदू मुसलमान मोठ्या संख्येने त्यांच्या दर्शना-करता येऊ लागले. मुसलमान बहुदा कुणा हिंदू संताच्या दर्शनाकरता जात नसतात परंतू माणिक प्रभूजवळ काहीच भेदभाव नसल्यामुळे मुसलमानानाही त्यांची योग्यता पटून ते दर्शनास येत असत ही गोष्ट तेथील कट्टर मुसलमान मौलवी काजीना सहन झाली नाही. त्यांनी बीदरच्या नवाबाचे कान भरले व म्हणाले माणिक प्रभुमुळे मुसलमान धर्मास बट्टा लागत आहे. नवाबसाहेबास एक युक्ती सुचली तो म्हणाला की उद्या माणिक प्रभूस आमंत्रण देऊन बोलावू व गोमास खावयास लावू म्हणजे प्रभू बाटतील हिंदू फजीती पावतील व आपली ही कार्य सिद्धता होईल. त्यांच्यात भेदभाव नसल्यामुळे ते आमंत्रण नाकारू शकणार नाहीत. त्या प्रमाणे त्यांनी दुसऱ्या दिवशी मोठ्या अदबीने जाऊन प्रभूने अंतर्ज्ञानाने त्यांचा डाव ओळखला व त्याचे आमंत्रण स्वीकारले.

दुसऱ्या दिवशी नवाबसाहेबांनी पुष्कळशा गाई कापून गोमासाची नाना तऱ्हेची पक्वान्ने म्हणजे बिरयानी, पुलाव, गुल गुले, मालपोहे इत्यादी पदार्थ तयार करविले. ठरलेल्या वेळेस माणिक प्रभु राजवाड्यात येताच नवाब-साहेबानी मोठ्या थाटाने स्वागत केले. मुल्ला, काजी, व कट्टर मुसलमानाना आनंद वाटला तर सर्व हिंदू भक्त मंडळी चिंतातूर झाली. माणिक प्रभूस मुख्य अतिथीच्या स्थानी बसविले. काजी, मौलवी व इतर प्रतिष्ठीत मुसलमान मंडळी मेजवानी करता आली होती. ती ही पंक्तीत बसली. नवाब साहेबाच्या सेवकानी तबकात गोमासाचे पदार्थ भरुन त्यावर रुमाल झाकून ठेवले. माणिक प्रभूने

मनातल्या मनात परमेश्वराचे चिंतन केले व लज्जा राख म्हणून प्रार्थना भाकली तर मुसलमानानी बिसमिल्ला म्हणून तबकावरचे आच्छादन काढले तेव्हा त्यांना आश्चर्याचा धक्का बसला. सर्वच तबकात गोमांसाच्या पदार्थाच्या ऐवजी गुलाब, जाई, जुई, चमेली व मोगऱ्याने ताटे भरलेली दिसली. तेव्हा त्या पंक्तीत काही सज्जन मुसलमान होते ते गरजून म्हणाले की अरे माणिक प्रभूची सत्ता अगाध आहे ते दत्त अवतार म्हणजेच महबूब सुबाहनीचे अवतार अवतार आहेत. त्यांचा छळ केल्यास अल्लास राग येईल व तुम्ही केलेले राहणार नाहीत. नवाब साहेब व सर्व मुल्ला, मौलवी, काजी, माणिक प्रभूच्या पाया पडू लागले व क्षमा मागू लागले. संत तर दयावंत असतातच त्यांचे कार्य दुर्जनास सज्जन बनविणे व लोकाना खरा ईश्वरी महिमा दाखविणे व भेदभाव नाहिसा करणे हा असतो व ते मुद्दामच अशा ठिकाणी जाऊन आपली लीला दाखवून लोकांना भक्ती मार्गास लावीत असतात. त्या प्रमाणे माणिक प्रभूने नवाब साहेब व सर्व कट्टर मुसलमानाना उपदेश दिला. सर्वांनी मिळून प्रभूचा जयजयकार केला व त्यांची गादी बीदरात स्थापन केली.

गत वर्षी आठव्या साईलीला कवी सम्मेलनाच्या निमित्ताने गुंडेरावजी पटवारी साहित्य रत्न एन. एफ. जे. कॉलेज बीदर यांच्याशी माझी ओळख झाली. त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळे मी प्रभावित झालो. त्यांच्या मुखातून "साईराम" ओम् साईचा " अखंड जप चालू रहावयाचा व ते सर्व नवीन साई भक्तांना योग्य मार्गदर्शन करीत राहवयाचे. त्याच्या आठवणी मुळेच मला बीदर शहराची कल्पना आली व हा लेख मी लिहिला आहे.

सध्या संपूर्ण भारतात जातीवाद, प्रांतवाद, व भाषावादामुळे आप आपसात भेदभाव द्वेष व मत्सर वाढत आहे अशा प्रसंगी साईबाबांच्या उपदेशाची जाणीव करून देणे आवश्यक आहे, व ते कार्य सर्व श्रेष्ठ साईभक्त करीतच आहेत. संपूर्ण भारतात ठिकठिकाणी साई बाबांची मंदीरे उभारण्यात येत आहेत. अनेक साई भक्तांची मंडळे स्थापन झाली आहेत व साई बाबांचा संदेश "सब का मालिक एक हैं" हम सब आपस मे भाई भाई है पोहचवीत आहेत. ज्यामुळे काही जणाची मने वळत आहेत व एकदा ते शिर्डीस साई बाबांचे दर्शन घेऊन गेले म्हणजे आपो आपच त्यांच्यात परिवर्तन होऊन सम दृष्टी व सम भावना जागृत होत आहे हे आपण सर्वजण प्रत्यक्ष पाहतच आहोत.

श्री गुंडेरावजी पटवारी हे ही यथा शक्ती साई बाबांच्या शिकवणीचा प्रचार बीदर या ठिकाणी करीत आहेत. त्यामुळे आनंद वाटतो.

शेवटी साई बाबांच्या चरणी प्रार्थना आहे की सर्व देश वासीयांना त्यांनी आशिर्वाद द्यावा व सन्मार्गी लावावे.

" जय साई "

★

नांदा सौख्य भरे

वडाळा येथील साईभक्त व श्रीसाईलीलाचे कवी श्री. दामोदर दळवी यांची कनिष्ट कन्या चि. सौ. कां. हेमलता हिचा विवाह श्री. शांताराम राणे यांचे जेष्ठ सुपुत्र चि. रघुनाथ यांचेबरोबर ब्राम्हण सहाय्यक संघ, शिवाजी पार्क दादर येथे मंगळवार ता. ५–४–१९८३ रोजी थाटाने साजरा झाला. वधूवरांचे हार्दीक अभिष्ट चिंतन.

× × ×

अधिकारी–चिटणीस

• श्रीसाईलीलाच्या सिद्धहस्त लेखिका सौ. उषाताई अधिकारी, रत्नागिरी यांची ज्येष्ठ कन्या चि. अभया हिचा शुभ विवाह गुरुवार ता. २८–४–८३ रोजी सकाळी ११–२१ वाजता पुणे येथे श्रीगोवर्धन कार्यालय शनिवार पेठ पुणे येथे श्री. जयंतराव चिटणीस यांचेबरोबर थाटात साजरा झाला. वधूवरांना शुभाशिर्वाद देण्यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी हजर होती. वधूवरांचे हार्दीक अभिनंदन.

× × ×

• इसलामपूरचे बेलीफ श्री. मारुती कृष्णा देसाई (कळसे) यांची कन्या चि. रंजना हिचा विवाह कैं. सखाराम पाटील यांचे चिरंजीव श्री. गुणवंतराव यांचेबरोबर ४–४–१९८३ रोजी दुपारी ३–४८ वाजता उरण माळ गल्ली इस्लामपूर येथे थाटात पार साजरा झाला.

# भक्ताचा चित्थरारक, रोमहर्षक अनुभव

संकलन : श्री. शाम अहुजा, ठाणे (पूर्व)

श्री साईलीलेच्या एका अत्यंत जुन्या अंकात भक्त श्री. काकासाहेब दीक्षितांनी खालील सत्यघटना नमूद केलेली आहे. साई भक्तांना ही घटना वाचून सद्-गद्‌गदीत अंत:करण झाल्यावाचून रहाणार नाही. शिवाय ही घटना बाबांच्या प्रकाशित झालेल्या चरित्रात दिसत नाही. श्री साईलीलेचा वरील घटनेचा अंक शिरडी "हेमाडपंत" वाचनालयात उपलब्ध आहे.

"काकासाहेब दीक्षित सांगतात —"

"यंदा रामनवमीच्या उत्सवाकरिता शिर्डीस आलेल्या मंडळीत दासगणू महाराजांचे परिवारात मोगलाईतील मुखेडचे रहिवाशी रा. रा. बाबा रामचंद्र पत्तेवार आपले कुटुंब सौ. कृष्णाबाई यांच्यासह आले होते. रा. पत्तेवार हे नेहमी शिर्डीस येणाऱ्या महाराजांच्या भक्त मंडळीपैकी आहेत. उत्सव समाप्ती झाल्यानंतर बाबा, सौ. कृष्णाबाई व रा. दामु अण्णा (दासगणू महाराजांचे शिष्य) असे त्रिवर्ग शिर्डीहून मुंबईस येण्याकरिता निघाले. ते मनमाडास पहाटे तीन वाजताच्या पॅसेंजर गाडीत बसले ही गाडी दुसरे दिवशी ११ वाजता ठाण्याचे स्टेशनावर आली. रखरखीत उन्हामुळे सौ. कृष्णाबाईंना फार तहान लागली व ठाण्यास गाडी काही वेळ उभी रहाते म्हणून त्या नळावर पाणी पिण्याकरिता भांडे घेऊन गाडीतून खाली उतरल्या ही सर्व मंडळी गाडीत मागच्या डब्यात बसलेली होती व स्टेशनचा नळ पुढच्या बाजूला एन्जिनकडे होता. त्यामुळे बाई तिकडे गेल्या. नळावर फार गर्दी असल्यामुळे सौ. कृष्णा-बाईला तसेच उभे रहावे लागले. बराच वेळ झाला बाई परत आल्या नाहीत म्हणून बाबाही खाली उतरले व नळाकडे गेले. गाडी सुटण्याची वेळ होत आली, मंडळी परत आली नाहीत म्हणून दामू अण्णाही खाली उतरुन नळाकडे जाण्यास निघाले, ते नळापर्यंत पोहोचण्यापूर्वीच गाडीने शिटी फुंकली त्यामुळे त्यांनी दोघांना लवकर मिळेल त्या डब्यात चढा म्हणून ओरडून सांगितले व स्वत: आपणही दुसऱ्याच एका डब्यात चढले. गाडी चालण्यास सुरूवात झाली व गाडी चालू असतानाच घाईने एका डब्यात बाबा चढले व नंतर पुढे आलेल्या डब्यात बाई चढू लागल्या, परंतु हातात तांब्या व गाडीला साधारण वेग मिळालेला होता त्यामुळे बाई चढण्याचा प्रयत्न करीत असतानाच त्यांचा पाय

निसटून त्या प्लॅटफॉर्मच्या व गाडीच्या मध्ये पडल्या, मंडळी डब्यात चढली की नाही हे एका बाजूने दामु अण्णा पहात होते, व दुसऱ्या बाजूने बाई गाडीत चढल्या की नाही हे बाबा पहात होते. दोघांनी बाई गाडीखाली पडलेली पाहून प्लॅटफॉर्मवर उड्या टाकल्या, "बाई पडली बाई पडली म्हणून हाकाहाक झाली गाडी थांबविण्यास लाल बावटा दाखविण्यात आला. बाबा व दामु अण्णा यांच्या तोंडचे पाणी पळाले व कोठेतरी छिन्न विछिन्न झालेला बाईचा देह दिसणार अशी त्यांना धास्ती वाटली. गाडी थांबली व मंडळी गाडी खाली पाहू लागली इतक्यात प्लॅटफॉर्मच्या व डब्याच्या मधल्या जागेत सौ. कृष्णाबाई उभ्या राहिलेल्या दिसल्या. दामु अण्णांनी धावत जाऊन त्यांना वर चढण्यास हात दिला. साहजिकच मंडळींची गर्दी झाली व कोठे लागले काय लागले वगैरे प्रश्न होऊ लागले, बाई मुळीच घाबरलेल्या दिसल्या नाहीत उलट शांतपणे त्यांनी सांगितले की "मला काही लागले नाही, गाडीत बसा." सर्वजण गाडीत बसल्यावर बाईंनी सांगितले की पाय निसटून पडल्याबरोबर पुढे काय होणार हे त्यांना कळून चुकले व त्यांनी साहजीकच श्रीसाई बाबांचा धावा केला लगेच श्री साई महाराज तेथे प्रकट झाले व त्यांनी बाईंना प्लॅटफॉर्मच्या खालच्या पोकळीत हातांनी लोटले व आपण जवळ राहिले, त्यांच्या पुढून ५ –७ गाडीचे डबे गेल्यावर गाडी थांबली, महाराजांना प्रत्यक्ष पाहिल्यावर बाईची भीति पार उडून गेली. गाडी थांबल्यावर त्या उठून प्लॅटफॉर्मवर चढेपर्यंत त्यांना महाराजांची प्रत्यक्ष मूर्ति शेजारी दिसत होती. सौ. कृष्णाबाईंना फक्त हाताच्या कोपराजवळ थोडेसे खरचटले या शिवाय काही लागले नाही.

महाराज सध्या देहधारी नाहीत, तरी आपल्या भक्तांकडे त्यांचे पूर्ण लक्ष असते व संकटकाळी भक्तांकरिता प्रकट होऊन त्यांचे रक्षण कसे करतात याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे. महाराजांवर पूर्ण निष्ठा ठेवल्यास कुणाही भक्ताला असा अनुभव मिळू शकेल.

★

# माधवी–माधव

(श्री साई प्रेम कथा)

श्री. ग. रा. पालकर
२३३/२ दारूवाला चाळ, बझारवॉर्ड, कुर्ला, मुं. ७०

० माधवीची नजर श्री साईबाबांच्या प्रेममय मूर्तीवर खिळून राहिली होती. समाधी मंदिरात इतर भक्त मंडळीसह तिचे यजमान माधवराव तसेच श्री साईबाबांवर निस्सिम श्रद्धा असलेले तिचे आईवडीलही अभिषेकाचं ताट घेऊन बसली होती. जीवनात एक उठलेली वावटळ साईबाबांच्या कृपेने शमली होती, असं तिचं प्रांजळ मत होतं. माधवच्या प्रेमात पडल्यापासून तिचं अश्रद्धाळू मन साईबाबांकडे हळू - हळू केन्द्रित झालं ते माधवमुळे. त्याच्या व्यक्तीमत्वाने तिला जसं भारलं होतं. तद्वत त्याच्या साईभक्तीनेही तिला भुरळ पाडली होती.

भटजी समाधीच्या बाजूला बसून, जमलेल्या भाविकांना अभिषेक विधी सांगत होते. व त्याप्रमाणे करवूनही घेत होते. माधवीचे याकडे लक्ष नव्हतं. साईबाबांच्या मूर्तीकडे पहात- पहात भूतकाळातले सारे क्षण ती आठवीत होती.

"अहो! ऐकलंत कां ?" तिच्या आईने माधवीच्या वडिलांना स्वयंपाक घरात बोलावून म्हटलं होतं.

"बाहेर आलेल्या पाहूण्यांना म्हणाव, आम्हाला यंदा कर्तव्य नाही. मुलीची अजून शिकायची इच्छा आहे."

"अग पण ! चांगलं स्थळ आहे. मुलगा डबल ग्रॅज्युएट, चार आकडी पगार. पुण्याला स्वतःचा प्लॉट तेव्हा....."

त्यांना मध्येच थांबवीत तिची आई म्हणाली होती.

"माधवीची जर इच्छाच नाही तर ?"

"आणि उपवर झालेल्या मुलीला आपण कुठवर घरात ठेवणार आहात ? एकुलती एक असली म्हणून काय झालं. कधी वाकडं पाऊल पडलं तर ? नाही म्हटलं तरुण वय आहे ना ?" इति माधवीचे वडील.

"हे पहा ! मनात संशयाचं घर करून, तिच्या इच्छेविरुद्ध का लग्न करून देणार आहात तुम्ही ?" माधवीची आई.

"राहिलं बुवा!" असं म्हणत माधवीचे वडील बैठकीच्या खोलीत निघून गेले.

माधवीच्या चुलत मामाने आणलेलं ते स्थळ होतं. माधवच्या प्रेमात पडलेल्या माधवीने शिक्षणाचं निमित्त सांगून ते पिटाळलं. तेव्हा तिचं बी. ए. च पहिलं वर्ष होतं. माधव तिचा वर्ग सोबती. अत्यंत बोलका, हुशार आणि आकर्षक व्यक्तिमत्व असलेला. गिरगावातल्या एका लॉजिंग बोर्डिंगमध्ये राहून, नोकरी आणि शिक्षणाचा व्याप संभाळणारा. अनाथाश्रमात वाढल्यामुळे जसा कनवाळू तसा कामसू देखील. माधवीला त्याच्या या कर्तृत्वाचे विशेष आकर्षण होतं. तसंच त्याच्याबद्दल जिव्हाळा अन् आपुलकीही होती. यातूनच पुढे प्रीतीचे नाजूक बंध जुळत गेले. दोघांच्याही नकळत. कधी माधव भेटला नाही की, माधवीचा जीव कासावीस व्हायचा. तर कधी माधवी भेटली नाही कि माधव बेचैन व्हायचा. प्रीतीच्या मोहक हिंदोळ्यावर झुलणारे दोन वेडे जीव, "माधवी-माधव."

रामनवमी उत्सवानिमित्त शिरडीला जाण्याचा आपला बेत माधवने माधवीला सांगितला. तेव्हा तिनेही त्याच्याबरोबर जायची आपली इच्छा व्यक्त केली होती. फक्त माधव ऐवजी मैत्रिणी बरोबर सहलीला जातेय असं तिने घरच्यांना खोटं खोटं सांगितलं इतकंच. आयुष्यात खोटं बोलण्याची ही तिची पहिलीच वेळ. कारण खरं सांगण्याचं तिला धाडस झालं नाही. अन् खरं सांगितल्याने तिला माधवबरोबर जाताही आलं नसतं. प्रेमापोटी खोटं बोलण्याचा एक अनामिक आनंद मात्र तिच्या अंतःकरणात दाटला होता. प्रीतीची केवढी मोठी किमया ही.

रामनवमीच्या उत्सवानिमित्त श्रीक्षेत्र शिरडी येथे माणसांचा महापूर लोटला होता. लहान बालकांपासून, वयोवृद्ध माणसे देखील या साईभक्ती प्रवाहात सामिल झाले होते. निर-निराळ्या प्रांतातल्या, निर-निराळ्या देशातल्या साईभक्तांचा तो एकप्रकारी आंतरराष्ट्रीय मेळावाच. भिन्न भाषा, भिन्न शरीरे, भिन्न मने पण अंतःरंगी भावना एकच, "साईभक्ती, साई प्रेम."

शिरडीच्या वास्तव्यात माधवीने माधवला खूपच [जवळून पाहिलं होतं. भल्या पहाटे तो जागा झाला की, माधवीला उठवायचा. दोघं स्नान संध्या आटोपून काकड आरतीला जायची. तेथून द्वारकामाईत माधवची नित्याची

साधना चाले. तद्नंतर दोघांचा चहा फराळ. दुपारची आरती. नंतर संस्थानच्या भोजनगृहात जेवण. थोडी विश्रांती. सायंकाळी गुरूस्थान, चावडी, खंडोबाचे मंदिर आणि लेंडी बागेत भ्रमंती. पुन्हा सायंकाळची आरती, रात्रीचे भोजन-गृहात जेवण अन् शेजारती नंतर आपल्या निवासस्थानी दिवसभरची विश्रांती.

माधव तसा साईभक्तच. पण माधवीला मात्र त्याच्या साईमय जीवनाचे विविध पैलू येथे पहायला मिळाले. त्याच्या साई भक्तीने ती अंतर्मुख झाली. साईबाबांवर निस्सिम श्रद्धा असणाऱ्या आपल्या आईवडीलांना माधव निश्चित आवडेल असं तिला मनापासून वाटू लागलं. ऐहिक सुखाबरोबर परमार्थाची सांगड घालू पाहणाऱ्या माधवशी जीवनाचे अतूट नाते जुळवायला ती अधीर झाली होती. शिरडीतल्या सहवासातील प्रत्येक क्षणात तिने त्याच्यातील साईभक्तीचा मधूर आस्वाद घेतला होता. मुंबईला परततांना जीवन साफल्याचं परमोच्च शिखर गाठल्याचा अत्यानंद तिच्या चेहऱ्यावरून ओसंडत होता.

माधवीच्या प्रेमविवाहाचा विचार ऐकून तिच्या आईवडिलांना संताप अनावर झाला. एका घरंदाज मुलीने कुणा अनाथाश्रमात वाढलेल्या तरुणाशी विवाह करावा. हे त्यांच्या बुरसटलेल्या मनाला पटत नव्हतं. त्यांच्या संसार वेलीवर माधवीच्या रुपाने फुललेलं एकुलतं एक फुल अखंडीत टव-टवीत रहावं म्हणून तळ हाताच्या फोडाप्रमाणे त्यांनी तिचा सांभाळ केला होता. तिची प्रत्येक हौस-मौज पुरविली होती. अन् आज त्याच मुलीने घराण्याच्या अब्रूचा माता-पित्याच्या मनाचा विचार करू नये, याचं त्यांना अतिशय दुःख झालं होतं. त्यांनी आपापल्या परीने माधवीला बरंच समजावलं. तिच्या या निर्णया-मुळे घराण्याला कलंक लागेल. चार-चौघात उठता-बसता येणार नाही. समा-जातली आता पर्यंतची सारी प्रतिष्ठा धुळीला मिळेल. इत्यादी-इत्यादि. पण माधवी आपल्या निश्चयापासून परावृत्त होत नाही असं पाहिल्यावर तिच्या आईने साईबाबांना साकडं देखील घातलं "बाबा या मुलीला सुबुद्धी द्या. तिला तिच्या या निर्णयापासून परावृत्त करा." पण.... पण त्या साई माऊलीच्या मनात काय होते कुणास ठाऊक.

माधवीचा विरस झाला. जाती सारख्या भ्रामक कल्पनेवर तिचा विश्वास नव्हता. माधवने स्वकर्तृत्वाने घडविलेले स्वतःचे जीवन. कोणतेही धार्मिक पूर्व संस्कार नसताना देखील तरुण वयात अध्यात्मिक विषयात त्याने केलेली प्रगती. श्रीसाईबाबांवरची प्रगाढ भक्ती, आणि चार चौघात उठून दिसेल अशी

शरीर यष्टी पाहून, तिच्यावर जीवापाड प्रेम करणारे तिचे आईवडील या प्रेमविवाहास संमती देतील असं तिला वाटलं होतं. पण दांभिक प्रतिष्ठेच्या नाहक कल्पनेने तिच्या सोज्वळ प्रीतीचा हिरमोड केला.

दिवसें-दिवस माधवीच्या घरातलं वातावरण बदलत चाललं. कुणी कुणाशी बोलेना. नेहमी तिच्याशी प्रेमळपणे बोलणारी तिची आई या ना त्या कारणा-बद्दल तिची अवहेलना करू लागली. तिचे वडीलही तिच्याशी तिरसटपणे वागू लागले. स्वतःचा अहंभाव दुखावला गेला कि, माणूस कसा चवताळून उठतो. याचा प्रत्यय माधवीला येऊ लागला. प्रेम, आस्था, आपुलकी यांचा लवलेशही त्या घरात शिल्लक राहिला नाही. सगळीकडे कसं शांत-शांत. जणू स्मशानातली भयाण शांतता त्या घरात नांदू लागली होती. घर सोडून जाण्याचा माधवीने मनाशी निश्चय केला.

करारी स्वभावाच्या माधवीच्या वडीलांच्या मनावर दिवसें-दिवस विचाराचं ओझं वाढू लागलं. त्यांना माधवी बद्दल केवढा स्वाभिमान होता. आज तिच्या-बद्दल कुणाला काही समजलं तर... तर छिःथू होईल. समाजात कुठे तोंडही दाखवायला जागाही रहाणार नाही. या विचारानं त्यांना पुरतं पछाडलं. घरी-ऑफिसमध्ये त्यांच्या डोक्यात सारखा याच विचारांचा घोळ चालू असायचा. आणि या विचार चक्रात असतानाच त्यांच्या स्कूटरला मोठा अपघात झाला. वाचण्याची शक्यता फारच कमी असं डॉक्टरांचं मत पडलं. तसंच त्यांना रक्ताची सुद्धा तातडीने आवश्यकता होती. पण ते दुर्मिळ गटाचं रक्त सहसा सहजी मिळेल असंही नव्हतं. डॉक्टरांनी प्रयत्नांची पराकाष्टा केली. दूरदर्शन, आकाशवाणी, वर्तमानपत्रातून जनतेला या गटाच्या रक्तदानाबद्दल आवाहन केलं. पण कुठेच काही प्रतिसाद मिळाला नाही. शस्त्रक्रिया खोळंबून राहिली. मृत्यची गिधाडे माधवीच्या वडीलांभोवती घिरट्या घेऊ लागली.

माधवी बरेच दिवस भेटली नाही. म्हणून माधव शोध घेत-घेत दवाखान्यात आला होता. डॉक्टरांकडून त्याला रक्तदानाविषयी समजलं तेव्हा त्याने आपल्या रक्ताचा गट डॉक्टरांना सांगितला जो माधवीच्या वडीलांच्या रक्ताच्या गटाशी तंतो-तंत जुळणारा होता. श्रीसाईबाबांच्या कृपेचा केवढा मोठा हा योगा-योग.

माधवने रक्तदान केले. शस्त्रक्रिया झाली. या अपघातातून वडीलांचे प्राण वाचोत त्यांना लवकर बरे करा असा संकल्प सोडून माधवीने वडीलांच्या

कॉट शेजारी "श्रीसाई सच्चरित" या ग्रंथाच्या पारायणाला सुरवात केली. माधव तिच्या वडीलांची सुश्रुषा करू लागला. तिसऱ्या दिवशी माधवीचे वडील पूर्ण शुद्धीवर आले तेव्हा अनोळख्या माधवला पाहून त्यांना काही उमगेना डॉक्टरांनी त्याची ओळख करून देत म्हटलं.

"मिस्टर देशपांडे! हेच ते गृहस्थ ज्यांनी तुम्हाला रक्तदान करून तुमचे प्राण वाचविले आहेत. आता तुमच्या जीवावरचा धोका टळला असून काळजी करण्यासारखं तसं काही नाही."

अनोळख्या माधवला पाहून माधवीच्या वडीलांच्या डोळ्यात अश्रू तरारले. जणू बाबांच्या रुपात त्यांच्या समोर माधव पण त्यांना अज्ञात असा तरुण उभा होता.

काही दिवसानंतर डॉक्टरांनी त्यांना घरी न्यायची अनुमती दिली. एव्हाना माधवीचं "श्रीसाई सच्चरित" ग्रंथाचं वाचनही संपल होतं. म्हणून पारायणाची सांगता घरी करण्याचं ठरल. त्या निमित्ताने माधव प्रथमच माधवीच्या घरी गेला होता. माधवीच्या वडीलांनी त्याची आस्थेनं चौकशी केली. अन् स्वयंपाक घरात काम करीत असलेल्या माधवीला व आपल्या पत्नीला बोलावून म्हटलं.

"अहो! बाहेर पाहिलं का ? एक देव माणुस आला आहे. लवकर या."

माधवीच्या वडीलांनी माधवला देवमाणूस संबोधल्यामुळे त्याला कसं तरीच वाटू लागलं. तो मनात शरमला. तसा संकोचला देखील. यावर माधव काही बोलणार तोच माधवीच्या वडिलांनी त्याला थांबवीत म्हटलं.

"मला ठाऊक आहे. मी देवमाणूस म्हटल्याबद्दल तुला संकोचल्यासारखं झालं असेल. पण एका कर्तव्यदक्ष पुत्राने स्वतःच्या आजारी पित्याची जशी काळजी घ्यावी त्या प्रकारे तू माझी घेतलेली काळजी, केलेली सुश्रूषा, स्वतःच दिलेलं रक्त आणि विशेष म्हणजे माझ्यातल्या माणूसपणाची केलेली जागृती. याबद्दल मी तुला देवमाणूस म्हणून संबोधलं. माधवीच्या आईकडून मला माधवी व तुझ्याबद्दल सारं काही समजलं आहे." अन् माधवीला जवळ बोलावून त्यांनी तिचा हात माधवच्या हातात दिला. त्याच वेळेस.

"बेटा! अल्ला भला करेगा." असं म्हणत एक फकीर दारात उभा होता. माधवीच्या आईने पंचवीस पैशाचं एक नाणं त्याच्या हातात ठेवलं.

मंद स्मित करीत तो फकीर निघून गेला. क्षणभरातच मान्यांना आठवलं पारायणाच्या सांगतेचा आजचा दिवस. फकीर वेशात आलेले ते साईबाबा तर नव्हेत ? माधव धावतच बाहेर गेला. त्याने सगळीकडे शोध घेतला. पण तो फकीर माधवला कुठेच दिसला नाही. मान्यांच्या मनाला रुख-रुख लागून राहिली. कारण प्रत्यक्ष फकीर वेशात आलेल्या साईबाबांच्या चरणांवर मस्तक ठेवून त्यांचे आशिर्वाद घ्यायचे राहून गेले होते.

भटजींचा अभिषेक विधी संपला होता. एक एक भक्त समाधीजवळ जाऊन समाधीचे दर्शन घेत श्रद्धा सबुरीची भाव फुले वाहत होता.

★

श्रीसाईबाबा संस्थान परिचय लेखमाला

• श्रीसाईबाबा संस्थानचा सर्वांगीण परिचय करून देणारी लेखमाला श्री साईलीला मधून सुरू झालेली आहे. मध्यंतरी ही लेखमाला काही अपरिहार्य अडचणींमुळे खंडीत करण्यात आली होती. ती पुन्हा जुलै १९८३ पासून सुरू करण्यात येत आहे.

जुलै १९८३ अंकात वाचा "आमची निवासस्थाने"
लेखक—सदानंद चेंदवणकर, कार्यकारी संपादक श्रीसाईलीला
श्रीसाईबाबा संस्थान शिरडी.

प. पू. श्री. नरसिंहस्वामीजी चरित्रमाला

○ दक्षिण भारतात श्रीसाईबाबांचा सर्वंथैव प्रचार प्रसार करणारे अग्रणी आणि विख्यात तेजस्वी साक्षात्कारी संत प. पू. श्री. नरसिंहस्वामीजी यांचे चरित्र, चमत्कार श्रीसाईलीला जुलै अंकापासून क्रमशः वाचा.

मराठीतून अगदी प्रथमच—लेखक श्री साईनंद

# उदीचा महिमा

सौ. रेखा भालचंद्र माहीमकर.
२२-१६ गुरू नगर चार बंगला
अंधेरी (पश्चिम) वर्सोवा रोड
मुंबई ४०० ०५८.

० देव तारी त्याला कोण मारी? असे आपण पूर्वीपासून बोलत आहोतच पण "उदीरुपी संजीवनी जयापाशी तया कशाचे भय?" असे आज मला वाटते.

आमचे कुटुंब छोटे आहे. पण आमच्या घरातील प्रत्येक व्यक्ति सकाळी आंघोळ झाल्यावर, झोपताना व घराबाहेर पडताना उदी लावणारच. क्वचित प्रसंगी कोणी विसरलेच तर बरीच मोठी चूक झाल्यासारखे त्यांना वाटले.

माझ्या मुलाचे डोळे तसे अशक्त आणि त्यातून आम्हा सर्वांना चष्मा. अशा परिस्थितीत तो ५-६ वर्षांचा झाला तेव्हा अभ्यासाबरोबर त्याला गोष्टीची पुस्तके वाचण्याची आवड लागली. त्यामुळे त्याच्या डोळ्यांना अधिक त्रास होऊन तो सारखा डोळे मिचकावीत असे. त्यातून तो डोळ्यात काहीतरी गेल्याची सतत तक्रार करीत असे. अखेरीस त्याला डोळ्याचे तज्ञ डॉक्टरांना दाखविले. त्यांनी 'अ' जीवनसत्व कमी असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे औषध आहार सुरू केला. काही दिवसांनी त्याला बरे वाटू लागले. तसे औषध बंद केले. पुन्हा डोळ्यांना त्रास होऊ लागला. असे एका वर्षात ४-५ वेळा झाले. त्याला काही बरे वाटत नव्हते. तेव्हा डॉ. नार्वेकरांच्या सल्ल्याने त्याला डॉ. मोरजकरांना दाखवले. तेव्हा त्यांनी त्याला सर्दीचा त्रास होतो असे सांगितले. फक्त डोळ्यात घालण्यासाठी औषध दिले. डोळ्यात घातले तरी त्याला आराम पडत नव्हता अखेरीस साईबाबांची उदी फक्त ३ दिवस रात्री डोळ्यांना लावली व बाबांना गाऱ्हाणे घातले. त्यानंतर वर्ष झाले त्याला डोळ्यांचा त्रास झाला नाही. सर्दी झाली तरी डोळे चांगलेच बरे होते. ही बाबांची कृपा अन् उदीचा महिमा.

नाताळच्या रजेनंतर शाळा सुरू झाली. एकेदिवशी तो शाळेतून आला तोच एका बाजूचे डोके दुःखते म्हणून. बाम चोळले. औषध दिले. झोपून ठेवले. पण काहीच गुण येईना. डॉक्टराकडे नेले. औषध दिले. वेगवेगळे उपचार चालू होते

तरी सतत दोन दिवस तो कळा सहन करत होता. शेवटी आमची संजीवनी (उदी) सतत लावली आणि त्याला आराम पडला. तो खेळायला लागला.

माझी आज वर्षभर प्रकृती बरी नाही. बाबांच्या कृपेने आम्हाला डॉ. रमाकांत नार्वेकर भेटले आहेत. त्यांच्याच औषधामुळे मी सर्व व्यवहार सुरळीत करत होते. डिसेंबरमध्ये मी पूर्ण बरी झाले. माझा त्रास कमी झाला होता. आणि अचानक डॉक्टरांनी मला पोटाचे ऑपरेशन करण्यास सांगितले ते सुद्धा दोन महिन्यात. त्यांनी सांगितले आणि मी माझी दोन बाळंतपणे झाली नव्हे त्यांच्या कृपेनेच मला दोन गोजीरवाणी मुले मिळाली त्या डॉ. तारा रामाराव. त्यांच्याकडे गेल्यावर त्यांनी मला तपासले व प्रकृती बरी असल्याचे सांगितले. पण आम्ही उभयतांनी माझ्या पोटाच्या ऑपरेशनचा निर्णय त्यांना सांगितला तेव्हा माझ्या वयाचा किंवा कुठलाही विचार न करता त्या ऑपरेशन करण्यास कबूल झाल्या. मलाही खूप आश्चर्य वाटले व आनंद झाला. बाबांचीच कृपा.

ऑपरेशन होण्याआधी मी व सर्व मंडळी शिर्डीला जावून बाबांचे दर्शन घेऊन आलो. ऑपरेशन 'महाशिवरात्रीच्या' दिवशी ठरले होते. पण काही कारणाने ते १४–२–१९८३ रोजी चार दिवसानी करण्यात आले. ऑपरेशनच्या आधी अर्थात् आमची संजीवनी (उदी) पोटाला लावली. ऑपरेशन रुममध्ये गेल्यावर पूर्वी कधी न दिसलेला बाबांचा फोटो दिसला आणि माझी सर्व भीती नाहीशी झाली. ऑपरेशन उत्तम झाले. मी दररोज उदी लावतेच. पण तीन दिवसानी मी उठून फिरु लागले. हॉस्पिटलमध्ये १० दिवस म्हणजे मला १० दिवस माहेरी आल्याचा आनंद मिळाला. डॉ. ताराताई दररोज माझ्या आवडीचे जेवण पाठवील असत. मोठ्या सिस्टर आग्रहाने आम्हा दोघांना जेवायला घालीत. अशा आनंदात घरी आले. अन् मोठं ऑपरेशन झालं आहे हेच विसरले. त्यामुळे थोडी जास्त उठबस झाली व थोडे पोटात दुखले इतकेच बाकी सर्व ठीक आहे. बाबांची कृपा व त्यांचा आशिर्वाद यामुळे ऑपरेशनला आता फक्त पाऊण महिनाच झालेला असून मी बसून लेख लिहिण्याचा विचार व धारिष्ट्य करीत आहे.

बाबांची कृपा व बाबांची उदी रुपी संजीवनी आम्हाला उपयोगी पडते. तशीच तुम्हा सर्वांना उपयोगी पडू दे अशी इच्छा.

☆

# साई माऊली–पळवी दुःखाची सावली

–श्री. उज्वल वामनराव कुळकर्णी

आयुष्यात येणाऱ्या अनेक दुःखांना हंसत सामोरे जाण्याची कला काही व्यक्तिना साध्य झालेली असते पण तिच्या पाठीमागे असणाऱ्या अधिष्ठानाची मात्र आपण कधीच चौकशी करीत नाही. ही कला पाठीशी असणाऱ्या विश्वासक सावलीमुळेच साध्य होते. मनात सतत चांगलेच विचार आणल्याने कुठल्याही प्रसंगाची चांगलीच बाजू डोळयांना दिसते आणि आलेल्या प्रसंगांचा आनंद ती व्यक्ती मनमुराद लुटू शकते. पण दुःखाचा प्रसंग आला की अशावेळी हीच कला मनाचा समतोल ढळू न देण्याची फार मोठी कामगिरी पार पाडीत असते. अशावेळी चांगल्या विचारांचे संस्कार माणसाला धीर देणारे ठरतात आणि त्याबरोबर संतांची पाठराखण कामाला येते. कुणीतरी आपल्या पाठीशी आहे आणि आपल्या मनाचा तोल ढळू न देण्याची काळजी घेतो व अशी भावनाच मनाला धीर देणारी ठरते, आणि मग संकट पार होई पर्यंतचा काळ कसा गेला हे समजत नाही संकटाचा कालावधी टळल्यानंतर आपणास यावेळी इतकी मानसिक शक्ती कशी आली याचा विचार माणूस करतो. कुठलीही संतवाणी ही अशी मनाचा समतोल ढळ न देण्यास मदत करीत असते. पू. साईबाबांचे निरनिराळे अनुभव भक्तगण कथन करीत असतात तेव्हा एक गोष्ट निश्चित असते की मनाच्या असंतुलीत अवस्थेत त्यांना कुठली तरी-म्हणजेच पू. साईबाबांची सावली आपल्या पाठीशी आश्वासक स्वरुपात उभी असल्याचे जाणवते आणि मग श्रीकृष्णाच्या सारथ्यांच्या सहाय्याने कौरवांना आपल्या बाणांनी हैराण करणाऱ्या अर्जुनाप्रमाणे ती व्यक्ति दुःखावर अशी तुटून पडते की दुःखाचं कुठलंहि सावट शिल्लक रहात नाही, व संकटांची भिती नाहीशी होते. आणि वाटतं.—

असता पाठीशी साई माऊली
पळेल दूर दुःखाची सावली

# संकट समयी बाबा धावून येतात

**सौ. कुसुम केकरे**
चैताली हौसिंग सोसायटी,
ब्लॉक नं. १२ वेस्टर्न एक्सप्रेस
हायवे, बांदरा (पूर्व) मुंबई ५१.

० श्री साईबाबा धावा केल्यावर संकट समयी कसे धावून येतात याचा प्रत्यय मला आयुष्यामध्ये दोन वेळा आला आहे. तो असा ... माझा थाकटा मुलगा चि. प्रकाश सहा वर्षांचा असताना रात्री एकाएकी उठून घसा दुखतो म्हणून रडू लागला. अंगाला हात लावला तर ताप बराच वाटला. म्हणून डॉक्टरांना बोलावून आणले त्यांनी तपासले व औषध दिले. डॉक्टर म्हणाले घटसर्पाची साथ आहे तेव्हां काळजी घ्यावी लागेल. सकाळपर्यंत ताप उतरला नाही तर कळवा. घटसर्पाची साथ म्हटल्यावर आमची उभयतांची पाचावर धारण बसली. आम्ही दोघेही रात्री जागून साईबाबांचा धावा करून श्रीसाई-स्तोत्र आळीपाळीने वाचत होतो. आणि बाबांना विनवणी करत होतो की बाबा प्रकाशचा ताप घटसर्पाचा नसू दे व तो लवकर पूर्ण बरा होऊ दे. त्याच्या अंगाला बाबांची उदी लावून, पाण्यातून उदी त्याच्या तोंडातही टाकत होतो. मी साईस्तोत्राची १०८ पारायणे रात्री जागून पूर्ण केली. सकाळी त्याच्या अंगातून घाम येऊ लागला. रात्री त्याचा ताप १०४ पर्यंत होता तो सकाळी ९९ पर्यंत खाली आला आणि त्याचे घसा दुखणे थांबले होते. सकाळी १० वाजता डॉ. आले तेव्हा त्याचा ताप पूर्ण नॉर्मलवर होता व तो बाहेर मुलांमध्ये खेळायला हट्ट करत होता. एवढी त्याला हुशारी वाटत होती. डॉनी तपासले तेव्हां त्यांनाही आश्चर्य वाटले की रात्री ज्याचा ताप १०४ होता तो सकाळी बरा होऊन बाहेर जाण्याचा आग्रह धरतो. आम्ही डॉक्टरांना बाबांच्या उदीचा प्रभाव सांगितला तेव्हा तेही म्हणाले आमच्या औषधापेक्षा त्यांची कृपा केव्हाही श्रेष्ठ आहे. ती रात्र आम्ही दोघांनी घटसर्पाच्या धास्तीने भयंकर मनःस्थितीत काढली पण श्रीसाईबाबांच्या कृपेने पुढील अरिष्टातून वाचलो.

अशा या साई माउलीला आमचे शतःश प्रणाम!

श्री बाबांच्या कृपेचा दुसरा असाच मला अनुभव आला तो असा –

माझा मोठा मुलगा प्रदिप याला ऑफिसमध्ये कामावर असताना बेचैन वाटू लागले व सारखी चक्कर येऊ लागली. म्हणून वरिष्ठांची परवानगी घेऊन मित्राचे मदतीने तो घरी आला, त्याला मी ताबडतोब डॉक्टरकडे घेऊन गेले, त्यांनी ब्लडप्रेशर तपासले ते नॉर्मल होते. त्यांनी त्याला गोळ्या दिल्या, आणि दुसरे दिवशी जसलोक हॉस्पिटलमध्ये जाऊन सर्व तपासणी करून घ्या असे सांगितले त्यामुळे मी फार घाबरून गेले, श्रीसाईबाबा संकट समयी पावतात ही माझी श्रद्धा होती म्हणून मी बाबांचा धावा सुरू केला की बाबा "प्रदिप हॉस्पीटलमध्ये तपासणीला जातो आहे. पण काही रोग नसू दे, व त्याला बरे वाटू दे."

माझी सून सौ. प्रज्ञा आणि प्रदीप दोघाना उदी लावून हॉस्पीटलमध्ये पाठविले, आणि ते येईपर्यंत श्री साईस्तोत्राची पारायणे सुरू केली. ती दोघे जसलोक हॉस्पीटलमधून संध्याकाळी ५ वाजता घरी आली तेव्हा कळले की सर्व तपासणी झाली काहीही दोष नाही. तेथल्या मोठ्या डॉक्टरने सांगितले की तुमचे मनावर ऑफीस कामाचा म्हणा किंवा कसला तरी ताण पडला असला पाहिजे म्हणून चक्करा येतात. तुम्ही पंधरा दिवस पूर्ण विश्रांति घ्या काळजीचे कारण नाही, हे ऐकून माझे मनावरचा ताण कमी झाला आणि मी बाबांचे तसबिरी समोर हात जोडून बाबांना आळविले की तुमची अशीच कृपा माझ्या लेकरांवर असू द्या. जन्मभर तुमची सेवा करेन.

परमपूज्य साईबाबा आपल्या भक्तांवर त्यांची मनोभावे सेवा केल्यास हमखास पावतात अशी माझी दृढ श्रद्धा आहे.

धन्य ते बाबा, धन्य ती माऊली!

★

# संकटकाळी धावत येई, साईरूप हरी

श्रीमती राधाबाई पालेकर
१०६, शिवाजी पार्क, मुंबई २८.

° बुडत्याला काडीचा आधार तसा सप्टेंबरचा 'साईलीला' अंक उघडला, व त्यात प्रथम नजरेखाली आल्या त्या ओळी अशा. 'जर तू माझ्यावरच हे संकट निवारण करशील तर मी माझा हा अनुभव साईलीलेत देईन.'

हॉस्पिटलमधून मी अगदी दमलेल्या खचलेल्या अवस्थेत घरी आले होते. तेव्हा माझ्या साईबाबांनी ह्या ओळीच्या रूपाने मला धीर दिला. मीही लगेच श्रीसाईबाबांच्या फोटोसमोर उभी राहून म्हटले की, 'बाबा माझ्यावरच हे संकट आपण निवारण करा मीही हा माझा अनुभव साईलीलेत देईन. खरोखर त्यांनी माझी हाक ऐकली व मला काळजीमुक्त केले. ती हकिकत अशी—

पण त्याआधी हा थोडा पूर्वेतिहास. तसा माझा आणि बाबांचा संबंध २५ एक वर्षापूर्वी आला. माझ्या एका नातेवाईक बहिणीने मला त्यांच चरित्र वाचायला दिल. खर म्हणजे मी देव, साधुसंत मानणारी पण बाबांच चरित्र वाचून केवळ चमत्कारांचाच हा साधु असा माझा समज झाला व विशेष काहीं वाटल नाही. पुढे हाच साधु आम्हां सर्वांचा जीवनाधार होणार हे मला कुठे माहित होत! नंतर बरेच जणांकडून त्यांच्याबद्दल ऐकल, तरी माझ्या मनावर त्याचा काही परिणाम झाला नाहीं. पंधरा एक वर्षापूर्वी आमच्या एका साई-भक्ताने शिरडीला गेल्यावेळी आमच्यासाठी प्रसाद व श्रीसाईचा फोटो आणला. प्रसाद आम्ही घेतला व फोटो मी माझ्या कपाटात ठेवून दिला. मध्यंतरी दहा वर्षापूर्वी मला पारमार्थिक गुरू भेटले व मी त्यांच्याकडून नाम घेतले, व शक्यतो नामस्मरण करणं हाच आता माझा छंद झाला आहे. आध्यात्मिक पुस्तकात संतचरि वाचण हा माझा आवडीचा विषय. एकदा १९७९ मध्ये असेच हाता-तील पुस्तक संपल व आता कोणते पुस्तक वाचू? असा विचार मी माझ्या गुरुदेवांच्या फोटोपुढे उभी राहून करत होते, तोच दारावरची बेल वाजली व आमचे एक साईभक्त शेजारी घरात आले. मला म्हणाले की, माझ्याकडे एक प्रसादचा अंक आहे, त्यात श्रीसाईच फार सुंदर चरित्र आहे, तुम्हांला वाचायला आवडेल का? मला आश्चर्याचा धक्काच बसला. मी माझ्या गुरुदेवांना विचारले

विचारते काय आणि हे गृहस्थ त्याच क्षणी श्रीसाई चरित्राबद्दल विचारतात काय ह्यात माझ्या गुरुदेवांचीच इच्छा मी ते चरित्र वाचावे अशी असणार असं माझ्या एकदम मनात आलं व पूर्वीचा अनुभव बाजूला सारून मी त्यांच्याकडून अंक घेतला. वाचता वाचता मी इतकी भारावून गेले की, मला काही गोष्टीत माझ्या गुरुदेवात आणि श्रीसाईत विलक्षण साम्य वाटायला लागलं. इथेच श्री-साईनीं माझ्या मनाची पकड घेतली सारखं मनात येऊ लागलं की, अशा महात्म्याचा फोटो मी इतकी वर्ष पुजेशिवाय नुसताच कपाटात कसा ठेवून दिला आहे! तो बाहेर काढावा. परंतु माझे गुरुदेव आहेत मग मी दुसरा फोटो कसा ठेवू? असा सारखा संघर्ष माझ्या मनात चालला होता. इतक्यात मनात विचार आला की, जर माझ्या गुरुदेवांच्या प्रेरणेनेच मी हे चरित्र वाचले व फोटो पूजेत ठेवायची इच्छा होते तर मी त्यांनाच चिठ्ठ्या टाकून कां विचारू नये. ह्या विचारासरशी मन बरच शांत झालं. तो वार शुक्रवार होता. मी गुरुदेवां-पुढे चिठ्ठ्या टाकल्या व फोटो पूजेत ठेव अशी चिठ्ठी निघाली. मला इतका आनंद झाला की, मी त्याक्षणी श्रीसाईबाबांचा फोटो काढून माझ्या गुरुदेवांच्या शेजारी ठेवला. ह्या नवीन रूपांत माझे गुरुदेवच माझ्याकडे आले आहेत अशी माझ्या मनाची समजूत झाली. भक्तांच्या अडीअडचणींना धावून येण्यासाठीच हा साईअवतार आहे. ह्या गुरुमाउलीला माझ्या मनांत श्रद्धा निर्माण करायची होती. आणि अशा रितीने ह्या चमत्कार करणाऱ्या साधूने माझं मत परिवर्तन करायचा पहिला चमत्कार केला. माझ्या शेजारी साईभक्तांना तर ह्या गोष्टीचा इतका आनंद झाला की, त्यांनी मग माझ्याकडून श्रीसाईचरित्र पारायण, ब्राम्हण भोजन, शिरडीत सत्यनारायण व साईलीलेची वर्गणीदार इत्यादी गोष्टी करून घेतल्या.

अनुभव सांगण्यापूर्वी मागच्या भूमिकेची ही नांदीच फार लांबली. त्याबद्दल क्षमस्व.

पहिली अडचण आमच्या जागेसंबंधी भरलेल्या पैशाबद्दल कटकटी निर्माण होऊन कोर्टात वगैरे जावे लागते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. घरात सर्वजण अस्वस्थ कुणालाच नवीन जागेचा आनंद नाही. तेव्हा मी बाबांना प्रार्थना केली की, आजवर मी तुमचे चमत्कार ऐकले, आता आम्हांला संकटमुक्त करून चमत्कार दाखवा, म्हणजे मला तुमची सत्यता पटेल. अज्ञानी मन ह्याहून दुसरं काय सांगणार! आईला मुलाचं मन सांगाव लागत कां! आता आमच्या-वर काही अडचणी येणार त्या निवारण करण्यासाठीच तर ही माऊली आधीच

आमच्या घरी आली होती. जादूची कांडी फिरवल्यासारखी सर्व कटकट मिटली व आम्ही लगेच नवीन घरात आलो. माझ्या हृदयातील श्रद्धेचं घरही बळकट झाल. अजूनही बाबांना सर्वात मोठा चमत्कार करून माझ्या मुलाच्या सुनेच्या मनात श्रद्धा निर्माण करायची होती. तो प्रसंग असा, गेल्या ऑगस्टमध्ये माझा मुलगा पोटाच्या दुखण्याने फार आजारी झाला व आमच्यावर मोठा कठीण प्रसंग आला. दिवस रात्र 'देवा देवा साई साई' असा धावा चालला होता. अशा स्थितीत बाबा धावून येत नसता रहातील हे शक्य तरी आहे का? पण किती झाल तरी आपल मानवी भित्र मन. पण ह्या वरच्या ओवींनी बाबांनी मला आश्वासन दिलं व मनाला धीर आला. माझ्याकडूनही अशी सेवा बाबांना पाहिजे असणार म्हणून मी हा अनुभव 'साईलीलेत' द्यायच त्यांना कबूल केल. आणि माऊलीच्या कृपेने माझा मुलगा हळूहळू सुधारायला लागला. शेवटी सर्वात मोठ आश्चर्य किंवा साईलीला म्हणा, दर सोमवारी आणि गुरुवारी आपल्या मंदिरात येऊन प्रसाद न्यायचा आदेश श्रीसाईबाबांनी माझ्या सुनेला स्वप्नांत येऊन दिला. व ती आता त्याप्रमाणे जातात हे सांगायला नकोच. अशा-रितीने श्रीबाबांनी आम्हां सर्वांना आपलस केल आहे. आता श्रीगुरुसारिखा पाठिराखा आहे हे सिद्ध झाल्यावर काळजीच कारण नाहीं. आता बाबांशी एकच प्रार्थना, त्यांनी माझ्या मुलांना संसारात समाधानाने ठेवाले व मला माझ्या नामाच समाधान द्याव.

जय गुरुदेव जय श्रीसाईनाथ

卐

# साईबाबांचे चिंतनीय बोधामृत व तत्वज्ञान

संकलन—श्री. गौराम गोविंद उरणकर
मु. पो. पनवेल, ता. पनवेल
जिल्हा रायगड ४१० २०६

० परमेश्वरावर श्रद्धा, विश्वास ठेवा व आशीर्वाद मागा म्हणजे सर्व काहीं मना सारखे होईल. ० परमेश्वराला प्राप्त करुन घेण्यासाठी अथवा त्याची कृपा होण्यासाठी श्रद्धा व सबुरी या गुणांची अत्यंत जरूरी आहे. ० परमेश्वराचे चिंतन आपल्या हृदयात निरंतन ठेवावे. ० झाडे, फळे आली की वाकतात (नमतात) तसे श्रीमंती आली तरी गर्व न करता नम्र व्हावे. ० सुखी असा वा दुःखी असा परमेश्वराचे स्मरण संतत ठेवा त्याची आठवण करा. ० जो सत्याचे पालन करतो त्याच्या मागे मी आहे. ० तुम्ही ज्या दृष्टीने मजकडे पाहता त्याच दृष्टीने मी तुमच्याकडे पाहतो. ० माझ्या अखंडित नाम स्मरणाने तुमचा वेडा पार होईल. ० तुम्ही आपल्या कुळ—देवताचे अथवा गुरुचे सदोदित चिंतन करा तीच खरी साधना—योग मार्ग आहे. ० जे मला शरण येतील त्यांचे मी कबरीतून रक्षण करीन. ० सत्य हे मला प्रिय आहे. तो माझा धर्म आहे. म्हणून माझ्या खऱ्या भक्तांना समाधी—तून मी आशीर्वाद देतो. ० मोहपाशातून अलिप्त होऊन जो भक्त माझ्या जवळ येतो त्यावर माझी कृपा असते. ० — साई — साई या नाम मंत्राने तुमचे कल्याण होईल. ० जेथे भक्ती श्रद्धावित । तयाचा मी नित्यांकित । ये अर्थी न व्हावे शंकित । इतरत्र अप्राप्त मी सदा ० जर मानवी देहाचे साधन म्हणून पिंड पोषण, देह पोषण व मैथुन हेच असेल तर तो मानव जन्म निरर्थक समजावा. ० मैथुन, निद्रा, भय, आहार इत्यादितच मानवाच्या आयुष्याचा विनियोग होत असेल तर मग पिशाच्च आणि मानव यामध्ये फरक तो काय. ० नरदेहाचे सार्थक न करणारा मानव पुच्छ नसलेला नरपशु सारखा असतो. ० मनुष्य प्राणी मुक्त आहे. तो निर्भय स्वतंत्र आहे हे प्रत्येक माणसाने जाणून घेतले पाहिजे. ० आपण आलो कोठून? जायचे कोठे? या गोष्टीचे मूळ कारण माणसाने समजावून घेऊन मगच साधना केली पाहिजे. ० पूर्व कर्माच्या गतीनुसार अवचित प्राप्त झालेल्या या नर देहाचे सार्थक करा ० प्राप्त झालेला हा नरदेह व्यर्थ वाया घालवू नका. ० अरे जरा! तू आपल्या सत्कर्माची कृती पोपटाच्या टोकदार लाल चोचीच्या रूपाने कुरतडून बाहेर

पड व आपल्या देहाचे सार्थक करून धन्य हो. ० जर तुमच्यापाशी कुणी काहीं मागायला आला व तुमच्याकडे त्यास देण्यासाठी काहीं नसेल किंवा त्यास देण्याची इच्छा नसेल तर देऊ नका पण! त्याचा तिरस्कार करू नका त्याच्या मनाला दुःख होईल. अवमान होईल असे बोलू नका. ० जर मला तुम्ही संपूर्ण शरण याल तर तुम्ही वाया जाणार नाहीं. मग तुम्हांस कुणासही भिण्याचे कारण नाहीं. ० सबका मालिक एक बाबा सांगती भक्तास पण स्वतः होते अल्ला मालिक सांगत नव्हते कुणास. ० आपण कुठेही असलो तरी आपल्या इष्ट देवतांचे व आपल्या गुरुचे कायम स्मरण करावे. ० ज्योतिष अथवा हस्त सामुद्रिक यांचेवर विश्वास ठेवू नका आपल्याला लाभलेल्या गुरु मंत्रावर अथवा त्याचे वचनावर संपूर्ण विश्वास ठेवून आपले कार्य करावे असे बाबा सांगत. ० जीव जिवाणूचा जो आत्मा तोच माझा आत्मा दोघांच्या आत्म्यात भेद नसून आमच्या दोघांचा आत्मा एकच आहे. ० ईशाने प्रत्येक प्राणी मात्राला आच्छादिले आहे. ० कोणतीही वस्तू (घर) बांधताना त्या वास्तू भूमिला प्रथम दान द्यावे. ० हरी (परमेश्वर) सद्‌भक्ति भावा करिता भुकेला असतो त्याला दांभिकता आवडत नाहीं. ० माझ्या कथा, बोधामृत, तत्त्वज्ञान यांचा संग्रह करा. त्याचे स्मरण करा म्हणजे प्रत्येकाच्या जीवाला समाधान शांति मिळेल. ० मान अवमान सोडून देवाद्वारी लीन व्हावे. त्याचे पुढेच पदर पसरावे. ० गरीबी अव्वल बादशाही असून ती श्रीमंती पेक्षा लाखपटीने मोलाची आहे. ० माझ्या कलागुणांचे (लीलांचे) भक्ती भावाने श्रवण केल्यास लेखन केल्यास तुमच्या मध्ये असलेल्या दुर्गुणांचे दोषांचे निरसन झाल्यावाचून राहणार नाहीं. ० आपल्या पूर्वजन्माचे लागेबांधे असल्याशिवाय कोणी आपल्याकडे येत नाहीं. मग तो कुत्रा असो, डुक्कर असो अथवा ती माशी असो. त्यांची हड हड करू नका. आपल्या जवळ असेल तर त्यांना द्या नाहींपेक्षा स्वस्थ रहा. ० मी अखिल भूमंडलात आहे, सर्वांच्या अंतर्यामी भरून राहिलो असून मीच सर्वांचा स्वामी आहे. ० परमार्थासाठी सहन केलेल्या संकटानी तुमच्यासाठी मोक्षाचे दार खुले होणार आहे. ० श्रद्धा ही एक अत्यंत बलाढ्य शक्ती आहे. जो आपल्या प्रिय दैवताची श्रद्धेने व निष्ठेने पूजाअर्चा करील तर तो कुठल्याही संकटातून वाचल्याशिवाय रहाणार नाहीं.

★

# बाबांची लीला

–सौ. अहिल्याबाई ढोबळे
१७७ "शिवनेरी" ३रा मजला
शीव (प.) मुंबई २२.

• सन १९५२ पासून मी, पति व मुले दरवर्षी शिर्डीस पूज्य साईबाबांचे दर्शनास जात आहोत, म्हणजे गेली ३० वर्षे आम्ही हे व्रत निष्ठेने पाळले आहे सबब साईबाबांचे चरणी आमची अविचल निष्ठा आहे. त्यांच्या चमत्कारांचे व संकट समयी भक्तांचे रक्षण करण्याचे अनुभव आम्हांला अनेकवेळा आले आहेत परंतु आजपर्यंत आम्ही ते "साईलीलेत" प्रसिद्ध करण्याचे कटाक्षाने टाळले. ह्यावेळी अलिकडे आलेला एक अनुभव मुद्दाम प्रसिद्धीसाठी पाठवित आहे. माझी मोठी बहिण श्रीमती सोनूताई चव्हाण, बी. ए., बी. टी. असून परेल–च्या शिरोडकर हायस्कूलमध्ये शिक्षिका म्हणून नोकरी करीत होती. तिचे सर्व आयुष्य इतरांना मदत करण्यात व उपयोगी पडण्यातच गेले आहे. गेल्या डिसेंबर १९८१ च्या ४ तारखला रात्री झोपेत कॉटवरून पडल्याचे निमित्त होऊन तिच्या उजव्या हाताला दंडाजवळ फ्रॅक्चर झाले. लगेच दुसऱ्या दिवशी शीवच्या लोकमान्य टिळक रुग्णालयात दाखल केले. एक्सरे काढून हात प्लॅस्टरमध्ये ठेवला. सुदैवाने ऑपरेशन करण्याची जरूरी पडली नाहीं. तीन आठवड्यानी प्लॅस्टर काढले हात वर खाली होऊ लागला. मी बाबांच्याकडे तिला लवकर बरे करण्यासाठी रोज प्रार्थना करीत होते. माझी प्रार्थना फळीला आली आणि माझ्या बहिणीचा हात बरा झाला. परंतु दुर्दैवाने तिच्या डाव्या हाताला व पायाला अर्धांगवायूचा झटका आला एका दुखण्यातून बरी झाली आणि हे दुसरे दुखणे आले. मी फार नर्व्हस झाले. आणि पूज्य बाबांना कळवळून प्रार्थना केली की मला तुम्ही अनेक चमत्कार करून दाखविले. इतकेच नव्हे तर अनेक प्रसंगी मार्गदर्शन केले. परंतु आजपर्यंत हे सर्व प्रसिद्ध करण्याचे मी टाळले. परंतु ह्या वेळेला मी तुम्हांला वचन देते की माझ्या बहिणीचा अर्धांगवायू झालेला डावा हात व पाय बरा करा. मी हा अनुभव "साईलीलेत" प्रसिद्धसाठी पाठविन, आणि काय आश्चर्य एक महिन्यात तिच्या हाताची बोटे व पाय हलू लागला. पुढे काही दिवसांनी ती आधार घेऊन चालायलाही लागली. चार महिने रुग्णालयात काढून चैत्र पाडव्याला म्हणजे

(२४ मार्च) तिला आईच्या घरी आणले. आता ती पूर्वीपेक्षा पुष्कळ बरी आहे. घरातल्या घरात चालते व स्वतःच्या हाताने जेवण घेते. बाबांच्या लीला अगाध आहेत. त्यांच्या चरणी माझे मस्तक विनम्र आहे.

# ठिकठिकाणचे श्रीरामनवमी उत्सव

गडहिंग्लज (जिल्हा कोल्हापूर) येथील श्रीसाईनाथ मंदिराचा पायाभरणी समारंभ सौ. व श्री. रावसाहेब बापूसाहेब कित्तूरकर यांचे शुभहस्ते गुरुवार ता. १४–४–८३ रोजी १२–३० वा. टिळक उद्यान भडगाव रोड येथे करण्यात आला.

शिरडी साई समाज, चंदीगड येथे श्रीरामनवमी उत्सव मुनीजी मंदीर हॉल. येथे रामनवमी ता. २१ एप्रिल रोजी साय. ६ ते ८ या वेळात साजरा करण्यात आल.

श्री. भगवती साई संस्थान कुर्ला, पनवेल व नवी दिल्ली येथील साई मंदिरातून श्रीरामनवमी उत्सव थाटात साजरे करण्यात आले. कुर्ला येथील मंदिरात उत्सव तीन दिवस चालू होता तर पनवेल दिल्ली येथे रामनवमीचा दिवसच उत्सव चालू होता.

## श्री साईनाथ भजन मंडळ परळ,

श्रीरामनवमी व साईनाथ महोत्सवानिमित्त अखंड हरीनाम सप्ताह गुरुवार ता. १४–४–८३ ते गुरुवार ता. २१–४–८३ या काळात उत्साहाने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन श्री. सदानंद चेंदवणकर कार्यकारी संपादक श्रीसाईलीला यांनी गुढीपाडव्याचे दिवशी रात्री ९ वा. केले. श्री. प्रभाकर महात्मे, भानुदास गावडे, सौ. शिल्पा देसाई, डॉ. बी. डी. देसाई, प्रा. नीला देसाई, श्री. मनोहर केळुस्कर व सद्गुरु श्री. वामनराव पै इ. ची आठ दिवसात किर्तने, प्रवचने, व्याख्याने, सुखसंवाद इ. कार्यक्रम झाले. राजा हरिश्चंद्र ' हा चित्रपटही दाखविण्यात आला.

## श्रीसाई निकेतन दादरचा श्री रामनवमी उत्सव

श्री साई निकेतन दादर या श्रीसाईबाबा संस्थान शिरडीच्या मुंबई कार्यालयात श्रीरामनवमी उत्सव मोठ्या थाटाने साजरा करण्यात आला. सकाळी ९ वाजल्यापासूनच भक्तांची श्री बाबांच्या दर्शनास ये जा सुरू झाली. ठीक १०-३० वाजता लावणी सम्राज्ञी सौ. आसावरी वायकूळ यांचा श्रीसाईबाबांच्याच गीतांचा खास कार्यक्रम ठेवण्यात आला होता. त्यांचा कार्यक्रम बहारीचा व श्रवणीय असाच झाला. दुपारी १ वाजता श्रींच्या आरतीचा कार्यक्रम झाला. त्यावेळी शेकडो भक्त हजर होते. प्रसाद वाटण्यात आला. सायंकाळी ६ वाजेपर्यंत कार्यालय भक्तांना दर्शनासाठी खुले ठेवण्यात आले होते.

LOVINGLY WE YIELD to devotees' repeated requests Our wonderful novels on Sai Baba.

in Hindi as **'प्रगटे मस्जिदमें साई भगवान!'**

costing Rs. 45/-

Also in English as **'A MISSION DIVINE!'**

costing Rs. 45/-

And in Marathi as **'मशिदीत प्रगटला परमेश्वर!**

costing Rs. 40/- for hard bound copy-Now All available at a concessional flat rate of Rs. 36/- cash, if ordered from us directly, Remember, this concession is for copies ordered upto Guru Poornima, 24 th July, 1983, only.

Please note POSTAGE will be Rs. 6.00 hereafter.

A BOOK THAT BRINGS BLISS & BLESSINGS to you.

Contact: 'PRASHANTI PRAKASHAN',
5, Vasant Apartments, Plot 47, Kastur Park,
Shimpoli Road, Borivali (W.) Bombay 400 092.

# साई पाहू या ग

साई पाहूया ग, साई ध्यावूया ग
साईनाथांच्या शिरडीला जाऊया ग ॥धृ.॥

दीप लावूया ग, गीत गाऊया ग
धूप चंदनाचा पाट मांडूया ग
फुले आणूया ग, हार गुंफूया ग
साऱ्या द्वारकामाईला सजवूया ग
साई माझा ग दिव्य राजा ग
त्याच्या भजनाचा आनंद घेऊया ग ॥१॥

भक्त काजाला साई धावला ग
साई शरणांगताला ग पावला
जाणी सत्याला ग, मानी प्रेमाला ग
चला वंदूया दयेच्या देवाला ग
साई बाबा ग, ज्ञान आभा ग
त्याच्या तेजानं पावन होऊया ग ॥२॥

श्री. शांताराम नांदगावकर
प्रशांत १९१, २० वा रस्ता, खार
मुंबई ४०० ०५२.

भक्तीगीत

श्रीसद्‌गुरू साईबाबा यांची परमभक्त कै. बायजाबाई यांनी ह्यातभर निस्वार्थीपणे बाबांची सेवा व भक्ती केली. बाबांनीही तिला भक्तीचे फळ देऊन कै. बायजाबाईंच्या जन्माचे सार्थक केले. तिच्यावर केलेले हे कवन.

# आई बायजाबाई

साईबाबांची सेवा करूनी
थोर भक्त झाली आई बायजाबाई
जयजय साईबाबा जयजय बोला
जयजय बायजाबाई जयजय बोला ॥धृ.॥

तात्या कोते पाटील यांची आई बायजाबाई
भाकर तिची खाई फकीर तो बाबासाई
भाकर देण्यासाठी फिरे रानोमाळी
भक्ति तिची मोठी बाबांचे नाव ओठी ॥१॥

आईपरी पित्यापरी बायजाला प्रेमाने
बाबांनी सांभाळीले
मुलापरी फुलापरी लावून माया खरी
तात्यांना गोंजारीले ॥२॥

भक्ति अशी महान, बाबा जेवल्याशिवाय
कधी न घास घेई अशी ही बायजाबाई
बायजासाठी पुत्र तात्यासाठी
बाबांनी फळ देऊन नेले कीर्तीशिखरावरी ॥३॥

लावणी सम्राज्ञी सौ. आसावरी वायकूळ,
संगीत विशारद. इ-९-८ वर्षनगर,
घाटकोपर (पश्चिम) मुंबई ४०० ०८४.

# साईचा संसार

साईचा संसार पहा साईचा संसार
गोष्टी आवडती फार साईचा संसार ।।धृ.।।

गोष्टी मधुनी शिकवण देती ।
बोधामृत पाजती गोड ।।१।। साईचा संसार

उथळ जागी पाणी शिंपित,
बाग फुलविली छान ।।२।। साईचा संसार,

जात्यावरती ग दळती ।
रोग हटविली पार ।।३।। साईचा संसार,

पणत्यामध्ये पाणी घालती
दिवाळी करती छान ।।४।। साईचा संसार

शाम्या सांगे भक्तजनासी
माझा साईसंत महान ।।५।। साईचा संसार

सौ. शारदा वाकनीस
सेंट्रल गव्हर्मेंट कॉलनी,
५२-५५०- ॲन्टॉप हिल,
मुंबई. ४०० ०३७

# साई आराधना

धावपाव साई आई ऐक माझी विनवणी
मी भुकेली तव मायेची, पुरवी आस मनीची ।।

तूच माझा गणपति, तूच माझा कुळपती
तूच माझी सरस्वती, देई मज अमृत वाणी ।।

तूच माझी विठाई, तूच माझी प्रिय जननी
सद्वचन तव पडो श्रवणी, करी मज सद्गुणी ।।

बहु बाजुनी संकट येती, चैन मना न पडी
तुझी आठवण धीर देई, मम त्रस्त मनी ।।

सुंदर पवित्र समाधिस्थानी रमले असता चिंतनी
तुझेच दर्शन देई साई, स्वर्गसुख मम लोचनी ।।

शिरडीवासी तू जगदीशा, येई धावोनी त्वरी
असो देत तव वरद हस्ता सतत माझ्या शिरावरी ।।

मी अजाण बालक मजवरी, करी कृपेची साऊली
पावन करी याच देही, तुझिया चरणकमळी ।।

नमस्कार

सौ. अनिता अनिल कोरडे
१८, भाकडवाडी, ४ था मजला,
गिरगांव मुंबई ४०० ००४.

# साई को आराम कहा

साईको आराम कहाँ दिनरात मुसाफिरी करते हैं
दुनियांके हर भक्तोंके घर आते जाते रहते हैं
साईको आराम कहाँ

कुछ भक्तोंके घर साई कभी चमत्कार भी करते है
तसबीर को पहेने हार फुलोंके हर दीन बढते रहेते हैं
सच्ची भक्ती करनेवाले दुःखी, सुखी हो जाते हैं
साईको आराम कहाँ

होत बडा परिवार साईका सबकी चिंता करते हैं
आती जब भक्तों पे बिपदा बाबा कष्ट मिटाते हैं
संसार हमारा साई चलाता उनके ही बलसे जिते हैं

साईको आराम कहाँ दिनरात मुसाफिरी करते हैं
दुनियाके हर भक्तों के घर आते जाते रहते है

जयवंत कुलकर्णी
कुलकर्णी कुटीर, १०, प्रार्थना समाज रोड,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०० ०५७.

★

# तूच किनारा आता

पंखाखाली झांक माझे अपराध साईनाथा
मायमाऊली दे सावली तूच किनारा आता ।।धृ.।।

गाऊनी थकलो आर्त विराणी
मुक्या मनाची मुकीच गाणी
म्हणे हुंदका काळजातला दे विसावा आता
मायमाऊली दे सावली तूच किनारा आता ।।१।।

विकल मनाची गाथा सरली
स्वप्नफुलांची वाट न उरली
सागर सरिते जैसे मिलन जीवन तुज अर्पिता
मायमाऊली दे सावली तूच किनारा आता ।।२।।

खुलेल केव्हां अंधारलेल लेणं
फुलेल केव्हां मनी चांदणं
तुझ्या प्राचीचे रंग लाभो विहंग होऊनी उडता उडता
मायमाऊली दे सावली तूच किनारा आता ।।३।।

श्री. प्रकाश विठ्ठल परब
वरळी, बी. डी. डी. चाळ नं. २१,
रुम नं. १६ मुंबई ४०० ०१८.

सौ. प्रमोदिनी पोतनीस यांनी श्री साईनाथ हॉस्पिटल शिर्डी येथे गुरुवार दिनांक १०–२–१९८३ रोजी दुपारी २ वाजता ज्या पाच सहा ओळी बोलल्या त्या शब्दावर आधारित :—

## साई कसा हा चाले तुझा खेळ

साई कसा हा चाले तुझा खेळ
याला नाहीं रे काहीं ताळमेळ ॥धृ.॥

भक्त येतो तुझ्या दर्शनाला
लावी हात तुझ्या समाधीला
अन्तर्यामी शांती मिळे त्याला
परी दैव योगे भोग भोगण्याला
त्याचे जीवाची होयी उलघाल
साई कसा हा चाले तुझा खेळ ॥१॥

तू विश्वाचा रे अधिपति
तुझ्या श्वासाने वृक्षवेली हालती
चंद्र सूर्य गोल फिरती
तुझ्या आज्ञेत वनचर राहती
ठेव सुखी तुझी सर्व बाळ
साई कसा हा चाले तुझा खेळ ॥२॥

साई तुझी मी लेक वेडी
बाबा तुझा मी दरबार झाडी
साईनामाची तार मी छेडी
दासी प्रमोदिनीला एकच गोडी
तुझ्या पदांगुलीचे दे मज जल
साई कसा हा चाले तुझा खेळ ॥३॥

सौ. प्रमोदिनी पोतनीस
पिंपरी.

# भक्ताची पुकार

हे राम कृष्ण गोविन्द देवा
कधी देशील संधी करण्याची सेवा
कधी करशील तू माफी केवा
दर्शन देवून करशील पावन केव्हा।
हे राम कृष्ण गोविन्द देवा ॥ १ ॥
हे साई बाबा गुलाब बाबा
अक्कलकोट स्वामी देवा
देशील तरी सद्गुरु मन्त्र केव्हा
समजेन मी चौऱ्यांशीचा फेरा पार तेव्हा
होईल कृपा दृष्टी माझेवर जेव्हा।
हे राम कृष्ण गोविन्द देवा ॥ २ ॥
हे पुण्डलीक बाबा, भोले बाबा,
धुनीवाले देवा
देशील चरणावर मस्तक ठेवण्याचा
मोका केव्हा
चरण परीस स्पर्श होताच लोखंड
बनेल स्वर्ण तेव्हा
गुरु वाचून जीवन पशूच्या समान
समजेल तेव्हा
हे राम कृष्ण गोविन्द देवा ॥ ३ ॥

–प्रो. एच. बी. महाले, एम. एस. पी.
अध्यक्ष, गणित विभाग,
ज. ह. शासकीय महाविद्यालय, बैतूल

# संततुस्ती

महाराज ज्ञानोबा काय गेले । तीन दकांनी दर्शन दिधले ।
नाथ महाराज भेटूनी आले । उपकार केले जगावर ।।

जनता पाठी चिकटरे मरण ।
एकाहूनि एक अभिन्न ।
मरण जीव प्रकृति लक्षण ।
जीवाचे जीवन ती विकृति ।।

मरण मारूनि जे उरती ।
पाय काळाचे शिरी जे देती ।
तया काय आयुर्दा याची क्षिती ।
अवतरती जे स्वेच्छेने ।।

जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ।
तोचि संत ओळखावा । देव तेथेचि जाणावा ।।

अजन्माद्यमेकं परब्रम्ह साक्षात् ।
स्वयं संभवं राममेवावतीर्णम् ।
भवद्दर्शनात संपुनीतः प्रभोऽहं ।
नमामीश्वरं सदगुरुं साईनाथं ।।

—पंढरीदास खर्डीकर

# शिरडी वृत्त माहे फेब्रुवारी १९८३

या महिन्यात श्रींच्या दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी नेहमीप्रमाणे होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे —

**कीर्तन** — १) ह. भ. प. देशमुख महाराज, शिर्डी.

२) ह. भ. प. शांतारामबुवा कुलकर्णी, जळगाव.

३) ह. भ. प. पुरुषोत्तम कुलकर्णी, उपळेकर बुवा, लातूर.

**प्रवचन** — १) ह. भ. प. देशमुख महाराज, शिर्डी.

२) ह. भ. प. लक्ष्मणमहाराज वाकचौरे, शिर्डी.

३) ह. भ. प. के. जी. कुमार, नासिकरोड.

४) ह. भ. प. हिराबाई देशमुख, देवाची आळंदी.

५) ह. भ. प. धनाजी भ. साळुंके, किवड.

**भजन, गायन, वादन वगैरे** — १) श्री. के. व्ही. गोपाळकृष्ण, विजयवाडा. २) श्री. स्वामी संजयानंद, बद्रीनाथ. ३) सौ. मीराबाई संजयानंद, बद्रीनाथ. ४) स्वामी कृष्णदासजी भजनी मंडळ, वृन्दावन. ५) द्वारकानाथ किसनराव भोसले, बरोडा. ६) श्री मधुकर गोपाळराव सोनवणे, बदोदा. ७) श्री. एस. टी. धुमाळ, शिर्डी. ८) श्री. अनिलकुमार पगारे, सायन. ९) श्री. पं. प्रबीर घोष, दस्तीदार, पटना. १०) श्री. विष्णू रघुनाथ गोडे, मुंबई. ११) श्री. दिलीपसेन जमालसेन, अंधेरी. १२) श्री. प्रकाश इनामदार, जयमाला काळे व "गाढवाचं लग्न" नाटकाचे कलाकार. १३) साईनाथ संकीर्तन मंडळी, जबलपूर. १४) झंकार कलामंदिर, मुंबई १३. १५) साईनाथ भजनी मंडळ, शिर्डी. १६) जादूगार विजयराज, नासिक. १७) पुष्पलता अनंत शिंदे, मुंबई. १८) श्री बाबूराव कुलकर्णी, मुंबई. १९) श्री रतनलाल शर्मा, नागपूर. २०) श्री आर. डी. पाध्ये, मुंबई. २१) श्री बाबूराव रंजा, पवार, एरंडगाव, तमाशा मंडळ २२) श्री गंगाराम बाबूराव मोहन. २३) श्री रंगनाथ बावजी पवार.

२४) श्री. कारभारी देवराम डीखे. २५) श्री. सुशीला दत्तात्रय साळवे, २६) श्री. देवीदास आनंदा माळी. २७) उषा दत्तात्रय साळुंके, २८) एकनाथ किसन पवार. २९) श्री. काशीनाथ पुला पवार. ३०) श्री हीरा बाळाजी सोनवणे. ३१) मीराबाई, श्रीसाईसेवा मंडळी, विजयवाडा. ३२) श्री गजाननबुवा भजनीमंडळ जीसरांगण. ३३) श्री. शंकर स्वामी संस्थान. शिवूर. ३४) इंदुमती चौवळ, मुंबई. ३५) कमलिनी विजयकर, मुंबई. ३६) कु. प्रतिमा विचारे, व श्री दिलीप करवीर ३७) श्री. तनुकांत चेंबूरकर. ३८) श्री विश्राम गजानन भिवंदे, ताडदेव. ३९) श्री डी. संपतकुमार, हॉस्पेट. ४०) श्री. प्रभाकर नामदेव राऊत, जामनी. ४१) श्री. विरेंद्र गह्रेवाल, वर्धा.

**महाशिवरात्र** — सालाबादप्रमाणे महाशिवरात्री निमित्त दि. ११–२–८३ रोजी श्रींच्या पालखीची मिरवणूक रात्री ९–१५ ते ११–१५ पर्यंत गावातून फिरून आल्यानंतर शेजारती झाली.

**हवापाणी** — शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

# शिरडी वृत्त माहे मार्च १९८३

या महिन्यात शिर्डीस श्री साईबाबांचे दर्शनासाठी साईभक्त मंडळी नेहमी-प्रमाणे आली होती. काही कलाकारांनी श्रींच्यापुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे

कीर्तन— १) श्री. ह. भ. प. रामचंद्र विष्णू गाडगीळ, संस्थान गवई यांची कीर्तने एकादशी व महत्वाचे दिवशी झाली. २) ह. भ. प. श्री. लक्ष्मण आनंदा मिरजकर इस्लामपूर.

प्रवचन— १) ह. भ. प. श्री. त्र्यंबक काशीनाथ जोशी, अहमदनगर

२) ह. भ. प. मुरलीधर महाराज देशमुख शिर्डी

३) ह. भ. प. निवृत्ती हनुमंत पाटील गोंदकर शिर्डी

४) ह. भ. प. लक्ष्मण महाराज वाकचोरे शिर्डी.

भजन, गायन, वादन वगैरे—१) श्री. साईनाथ भजनी मंडळ शिर्डी, २) स्वामी संजयानंद व ३) सौ. मीरा संजयानंद, बद्रीनाथ ४) श्री. दत्तात्रय दामोदर रासने ५) श्री. जयवंत कुलकर्णी व पार्टी मुंबई ६) श्री. अरविंद म्हात्रे ७) श्री. अनंत पांचाळ ८) श्री. मनोहर घडसे ९) श्री. सुनील डबीर १०) सौ. पुजा डबीर ११) श्री साई भजनी समिती कतनूर १२) श्री. कमलाकर तपस्वी व पार्टी पुणे, १३) श्री. सतिश काळे. १४) श्री. श्रीपाद शंकर साठे १५) श्री. विष्णू गणपत गरुड, १६) नारायण गणेश तपस्वी १७) श्री. प्रभाकर दत्तात्रय पारखी १८) श्री. दत्तोपंत बुरशे १९) श्री. गंगाधर जाधव २०) श्री. शिवाजी तुकाराम धुमाळ २१) सौ. वत्सला अच्युत नाडकर्णी दादर २२) श्री. साई सेवा संघ, अहमदाबाद २३) श्री. लक्ष्मण गणपत देवासकर मुंबई २४) श्री विलास भजनी मंडळ, लालबाग २५) सौ. वृंदा लिमये सायन २६) श्री. एन. पी. लालन ठाणा २७) श्री. सत्य साईबाबा सेवा समिती उल्हासनगर २८) श्रीमती अंजनीबाई लोलेकर मुंबई २९) कुमारभाई बँकर ३०) सुवर्णा बँकर ३२) श्री. दत्तप्रासादिक भजनी मंडळ. चेंबूर ३३) श्री आर. आदिके शवलू पिल्ले मद्रास व पार्टी ३४) श्री. आप्पाराव ३५) श्री इ. एम. मणी ३६) श्री. ड. पार्थसारथी ३७) श्रीनिवासन, ३८) श्री. डी. सिल्वाराजन मद्रास.

हवापाणी :—शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

# खुलासा

"शिरडीचे महात्मा श्रीसाईबाबा" हा श्री. रमेश चव्हाण, नवापूर यांचा लेख श्रीसाईलीला जानेवारी ८३ अंकात संपादकीयामध्ये किंचित फरक करून प्रसिद्ध करण्यात आला होता. गद्य साहित्याची श्रीसाईलीलाकडे आवक अगदीच तुटपुंजी असल्याने एक चांगला छोटेखानी लेख म्हणून त्यावर शेरा मारून तो घाईगर्दीच्या वेळी संपादकीयातून प्रसिद्ध करण्याचे योजिले होते, व शेवटी तो प्रसिद्ध पण झाला. संपादकीयातून छापलेल्या लेखाच्या लेखकाचे नाव व पत्ता प्रसिद्ध न करण्याची जगभरच्या नियतकालीकांची रुढी आहे व त्या पद्धतीस अनुसरून श्री. चव्हाण यांचे नाव जाहीर केले नव्हते. पण आता श्री चव्हाण यांच्या केवळ आग्रहास्तव हे येथे जाहीर करीत आहोत." —का. संपादक

## पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया शिबीर

श्री साईबाबा संस्थान शिरडी, तालुका पंचायत समिती कोपरगांव, प्राथमिक आरोग्य केंद्र रहाता व नगर परषिद कोपरगांव यांचे संयुक्त सहकार्याने दि. १४–३–१९८३ रोजी श्री साईनाथ हॉस्पिटल शिरडी येथे पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया शिबीर पार पाडण्यात आले.

शिबीरात एकूण ३२१ शस्त्रक्रिया करण्यात आल्या. रुग्णांची जेवणाची व चहाची सोय श्री साईबाबा संस्थान मार्फत मोफत करण्यात आली होती. नसबंदी शस्त्रक्रिया करून घेणाऱ्या पुरुषास अनुदान म्हणून :—

| | |
|---|---|
| १) शासकीय अनुदान– | रु. १५५–०० |
| २) शिर्डी संस्थानतर्फे | रु. २००–०० |
| ३) नगरपरिषद कोपरगांवतर्फे | रु. १००–०० |
| ४) पंचायत समिती कोपरगांव तर्फे | रु. ४५–०० |

तसेच प्रवर्तकास रु. ४०–०० देण्यात आले.

शिबीरात संस्थान रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. पी. एस. देशपांडे डॉ. एम. वाय. देशमुख, प्रथमिक आरोग्य केंद्र राहाताचे डॉ. गुंजाळ, चासवे डॉ. क्षिरसागर, नगरपषिद कोपरगांवचे डॉ. धुगे यांनी बहुमोल सहाय्य केले.

शिबीर यशस्वीरित्या पार पाडण्याचे कामी कोपरगांव तालुका पंचायत समितीचे सभापती श्री. काळवाघे, बी. डी. ओ. श्री. शिंदे, जिल्हा आरोग्याधिकारी श्री. मातखंडे, संस्थानचे न्यायालयधारक श्री काकरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

शिबीराचा समारोप समारंभ माननीय न्यायालय धारक यांचे हस्ते श्री साईनाथ रुग्णालयात पार पडला.

# साईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

| अ. क्र. | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | श्री साईचरित्र | मराठी | २२=०० | ६=०० |
| २) | ,, | इंग्रजी | १३=५० | ४=०० |
| ३) | ,, | हिंदी | १२=०० | ४=०० |
| ४) | ,, | गुजराथी | १२=०० | ४=०० |
| ५) | ,, | कन्नड | १०=०० | ४=०० |
| ६) | ,, | तेलगू | १३=०० | ४=०० |
| ७) | ,, | तामीळ | १२=०० | ४=६० |
| ८) | श्री साईलीलामृत | मराठी | ७=५० | ३=०० |
| ९) | ,, | हिंदी | ७=०० | ३=५० |
| १०) | ,, | गुजराथी | ४=२५ | ३=०० |
| ११) | अवतार व कार्य | मराठी | ४=०० | ३=०० |
| १२) | स्तवन मंजरी | मराठी | ०=२५ | ३=०० |
| १३) | ,, | गुजराथी | ०=३० | ३=०० |
| १४) | सगुणोपासना | मराठी | ०=५० | ३=०० |
| १५) | ,, | गुजराथी | ०=५० | ३=०० |
| १६) | तेलगू पुजाविधी | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| १७) | चार अध्याय | मराठी | १=२५ | ३=०० |
| १८) | श्रीसाईबाबा ऑफ शिरडी (मदचा) | इंग्रजी | ५=०० | ३=०० |
| १९) | कितँनमाला | मराठी | ०=७५ | ३=०० |
| २०) | सचित्र साईबाबा | मराठी | ४=०० | ३=०० |
| २१) | शिरडी दर्शन | इंग्रजी | ४=५० | ३=०० |
| २२) | मुलांचे साईबाबा | मराठी | १=७५ | ३=०० |
| २३) | ,, | इंग्रजी | १=७५ | ३=०० |
| २४) | ,, | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| २५) | ,, | गुजराथी | १=५० | ३=०० |
| २६) | ,, | हिंदी | १=७५ | ३=०० |

Regd. No. MH/BYE/26
LICENCE No. 19
Licence To Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

(कव्हर पृष्ठ ३ वरून)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७) | ग्रेट सेंट श्री साईबाबा | मराठी | ०=५० | ३=०० |
| १८) | श्री साईबाबा दि सुपरमॅन | इंग्रजी | ५=२५ | ३=०० |
| १९) | शिरडी गाईड | इंग्रजी | १=५० | ३=०० |
| २०) | ,, | मराठी | १=५० | ३=०० |
| २१) | शिरडी गाईड | गुजराथी | १=५० | ३=०० |
| २२) | ,, | हिंदी | छपाई चालू | आहे. |
| २३) | रुद्राध्याय | मराठी | ०=९० | ३=०० |

२४) श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र मराठी व इंग्रजी वार्षिक वर्गणी १०=०० प्रत्येकी प्रत १=००
(व्ही. पी. ची पद्धत नाही)

| अ.क्र. | फोटोचे नाव | फोटो साइज | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | आशिर्वाद फोटो | १४"×२०' | १=६५ | ३=०० |
| २) | ,, | १०"×१४ | १=१० | ३=०० |
| ३) | ,, | ७"×१०' | ०=५५ | ३=०० |
| ४) | ,, | ४"×५" | ०=२० | ३=०० |
| ५) | ,, | २"×३" | ०=१५ | ३=०० |
| ६) | दगडावर बसलेले बाबा (रंगीत) | १४"×२०" | १=६५ | ३=०० |
| ७) | ,, (काळा पांढरा) | १४"×२०" | १=६५ | ३=०० |
| ८) | मूर्ती फोटो | १३"×१८" | २=७५ | ३=०० |
| ९) | ,, | १३"×१८" | १=०० | ३=०० |
| १०) | द्वारकामाई कॅमेरा (रंगीत फोटो) | १०"×२० | १=१० | ३=०० |
| ११) | ,, (काळा पांढरा) | १०'×१४" | ०=८५ | ३=०० |
| १२) | कॅमेरा द्वारकामाई फोटो ,, | ९'×१२' | १=१० | ३=०० |
| १३) | ,, (रंगीत) | ९"×१२' | १=६५ | ३=०० |
| १४) | निळा | ९×१३ | ०=७५ | ३=०० |
| १५) | श्रीसाईबाबांचे पद्माचे कॅलेंडर | — — — | १६=०० | ८=०० |

मुद्रक : पांडुरंग मोरे, बॉम्बे नॅशनल प्रिन्टर्स प्रा. लि., ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ३१, संपादक व प्रकाशक : श्री. क. हि. काकरे, साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लाट नं. ८०४ बी. दादर, मुंबई १४